बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शुक्रवार दि.२० जून २०२५ | वर्षे४थे | अंक२९६वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## वेचक

### आंध्र प्रदेशमध्ये चकमकीत तीन माओवाद्यांचा खात्मा

**हैदराबाद :** आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीताराम राजू जिल्ह्यात बुधवारी पोलिसांशी झालेल्या चकमकीत सीपीआय (माओवादी)चे तीन वरिष्ठ म्होरके ठार झाले. आंध्र प्रदेश आणि ओडिशा सीमेवरील देवीपट्टनम वनक्षेत्रात माओवादविरोधी उच्चभ्रू दल ग्रेहाउंड्सच्या सैनिक आणि माओवाद्यांमध्ये गोळीबार झाला. जंगलात शोध मोहीम राबवणाऱ्या ग्रेहाउंड्सच्या कर्मचाऱ्यांनी माओवाद्यांना पाहिले आणि त्यांना आत्मसमर्पण करण्यास सांगितले. माओवाद्यांनी गोळीबार सुरू केला, तेव्हा सुरक्षा कर्मचाऱ्यांनी प्रत्युत्तर देत तीन माओवाद्यांना ठार केले.

### देशात कोरोनामुळे चार जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** देशात कोरोनाच्या नवीन प्रकारामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या झपाट्याने वाढत आहे. गेल्या २४ तासांत ४ मृत्यू झाले आहेत. यात महाराष्ट्रातील २, दिल्ली आणि केरळमध्ये प्रत्येकी १ रुग्णाचा समावेश आहे. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ पासून कोरोनामुळे ११३ जणांचा मृत्यू झाला आहे. सर्वाधिक मृत्यू केरळमध्ये ३६ आणि महाराष्ट्रात ३१ आहेत.

### जेजुरीत भीषण अपघातात एका महिलेसह ७ जणांचा जागीच मृत्यू

**जेजुरी :** जेजुरी-मोरगाव रस्त्यावर किर्लोस्कर कंपनीसमोर बुधवारी सायंकाळी सव्वासात वाजण्याच्या सुमारास कारने पीकअपला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात एका महिलेसह ७ जणांचा मृत्यू झाला तर २ मुलांसह ५ जण जखमी झाली. जेजुरी-मोरगाव रस्त्यावरील किर्लोस्कर कंपनी समोरील श्रीराम हॉटेलबाहेर पीकअप टेम्पोमधील साहित्य उतरविण्याचे काम सुरू होते. यावेळी जेजुरीकडून इंदापूरकडे जाणाऱ्या कारने पीकअपला जोरदार धडक दिली.

### ब्रिटीश गुप्तचर एजन्सी प्रमुखपदी पहिल्यांदाच महिलेची नियुक्ती



**लंडन :** प्रत्येक चित्रपटात जेम्स बाँडला आदेश देणारी एम१६ ची संचालक एक महिला असली तरी, ब्रिटनच्या ११६ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच एका महिलेलाच एम१६ संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. ४७ वर्षीय ब्लेझ मेट्रेवेली यांना ही जबाबदारी दिली आहे. मेट्रेवेली या १९९९ मध्ये एम१६ मध्ये सामील झाल्या होत्या. त्यांनी यापूर्वी तंत्रज्ञान आणि नवोन्मेष विभागाच्या म्हणजेच 'क्यू'च्या संचालक म्हणून काम केले आहे.



**सोन्याचा भाव**

| | |
|---|---|
| २४ कॅरेट प्रति तोळा | १००९१० रुपये |
| २२ कॅरेट प्रति तोळा | ९२५०० रुपये |



**चांदीचा भाव**

| | |
|---|---|
| प्रति किलो | १११००० रुपये |



बुधवारी इक्विटी बेंचमार्क निर्देशांकात सकाळप्रमाणे घसरण कायम राहिली आहे. परिणामी बाजारात पडझड झाली आहे. आज दिवसभरात वीआयएक्स (०.९९%) राहिला. आज सेन्सेक्स १३८.६४ अंकांनी घसरत ८१४४४.६६ पातळीवर राहिला आहे, तर निफ्टी ५० निर्देशांकात ५५.४० अंशाने घसरण होत निफ्टी २४८१२.०५ पातळीवर राहिला आहे.

# दहशतवादाविरुद्ध भारताचे धोरण कठोर

**दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या देशाला किंमत मोजावीच लागेल**

## जागतिक धोक्याविरुद्ध एकत्रित आणि निर्णायक कारवाई करण्याचे जी - ७ मध्ये पंतप्रधान मोदी यांचे आवाहन

### काश्मीर मुद्द्यावर पंतप्रधान मोदी यांची डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी ३५ मिनिटे चर्चा

◆ **ओटावा (वृत्तसंस्था) :**

कोणताही देश दहशतवादाला पाठिंबा देत असेल, तर त्याला त्याची किंमत मोजावी लागेल, असे विधान पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलं आहे. ते कॅनडातील जी-७ आऊटरीच सत्राला संबोधित करताना बोलत होते. तसेच यावेळी पंतप्रधान मोदींनी दहशतवादाविरुद्ध भारताच्या कठोर धोरणाचा पुनरुच्चार केला आणि या जागतिक धोक्याविरुद्ध एकत्रित आणि निर्णायक कारवाई करण्याचे आवाहन केले.

कॅनडातील जी-७ आऊटरीच सत्राला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर दहशतवाद्यांना पाठीशी घालणाऱ्यांना चांगलेच फटकारले. जागतिक शांतता आणि समृद्धीसाठी, आपले विचार आणि धोरण स्पष्ट असले पाहिजेत. जर एखादा देश दहशतवादाला पाठिंबा देत असेल तर त्याला त्याची किंमत मोजावी लागेल. एकीकडे, आपण आपल्या मर्जीनुसार विविध निर्बंध लादतो, तर दुसरीकडे, जे देश उघडपणे दहशतवादाला पाठिंबा देतात त्यांना बक्षीस दिले जाते. हे दुहेरी निकष थांबले पाहिजेत. २२ एप्रिल रोजी झालेला दहशतवादी हल्ला हा केवळ पहलगामवर हल्ला नव्हता तर प्रत्येक भारतीयाच्या ओळखीवर आणि प्रतिष्ठेवर हल्ला होता. तो संपूर्ण मानवतेवर हल्ला होता, असे पंतप्रधान मोदींनी म्हटलं.

कॅनडातील कनानास्किस येथे झालेल्या जी-७ शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी कॅनडाच्या पंतप्रधानांसह दक्षिण कोरिया, मेक्सिको, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि फ्रान्सच्या नेत्यांची भेट घेतली. त्यानंतर कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेतली.यावेळी पंतप्रधान मोदींनी कॅनडाचे पंतप्रधान कार्नी यांचे शिखर परिषदेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल कौतुक केले. यावेळी कार्नी यांनी आपण ऊर्जा सुरक्षा, ऊर्जा संक्रमण, एआयचे भविष्य, दहशतवादाविरुद्धच्या लढाईवर एकत्र काम करू शकतो. तुम्ही येथे असणे माझ्यासाठी खूप सन्मानाची गोष्ट आहे, असं म्हटले.



■ काश्मीर मुद्द्यावर मध्यस्थी स्वीकारली जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका पंतप्रधान मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर मांडली. पंतप्रधान मोदी यांनी बुधवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत फोनवरून चर्चा केली. यावेळी भारत आणि पाकिस्तान यांच्यात कुणीचीही मध्यस्थी भारताने ना कधी स्वीकारली, ना कधी स्वीकारणार, असे मोदी म्हणाले. यावेळी ३५ मिनिटे दोन्ही नेत्यांमध्ये संवाद झाला.

■ पंतप्रधान नरेंद्र मोदी जी-७ शिखर परिषदेसाठी कॅनडाच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यातच पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची बैठक होणार होती, पण डोनाल्ड ट्रम्प मध्येच दौरा सोडून अमेरिकेत परतले. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, पंतप्रधान मोदी आणि अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात कॉलवरून ३५ मिनिटे चर्चा झाली. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी दहशतवादाबद्दल भारताची भूमिका स्पष्ट केली. त्याचबरोबर पहलगाम हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावाबद्दलही ते बोलले. यावेळी पाकव्याप्त काश्मीरचा मुद्द्यावर तोडगा काढण्यासाठी भारताने कधीही तिसऱ्या देशाला मध्यस्थी करण्याबद्दल विचारले नाही आणि कधीही अशी मध्यस्थी स्वीकारणार नाही, असे मोदी ट्रम्प यांच्याशी बोलताना म्हणाले.

# येत्या १५ ऑगस्टपासून फास्टटॅगचा वार्षिक पास

**खासगी वाहनांना मिळणार दिलासा**

**केंद्र सरकारची मोठी घोषणा**

**एका दिवसात किती वेळाही टोल क्रॉस करा**

**वार्षिक पासमुळे सामान्यांना होणार फायदा**

◆ **नवी दिल्ली (प्रतिनिधी):**

जर तुम्ही दर दिवशी हायवेवरून प्रवास करत असाल आणि वारंवार तुम्हाला टोल भरण्यास अडचण येत असेल, तर केंद्र सरकारने फॉस्टटॅग आधारित वार्षिक पास योजना सुरू करण्याची घोषणा केली आहे. येत्या १५ ऑगस्ट २०२५ पासून देशभरात ही योजना लागू होईल. या योजनेतून लाखो वाहनचालक आणि प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. हा पास विशेषतः खासगी वाहन चालवणाऱ्यांसाठी तयार करण्यात आला आहे. ज्यात कार, जीप, व्हॅनसारख्या वाहनांचा समावेश असेल. या पासची किंमत ३ हजार असेल. या पास अंतर्गत वाहन चालक एक वर्षाच्या कालावधीत जास्तीत जास्त २०० वेळा टोलमधून प्रवास करू शकतात. त्याचा अर्थ वारंवार टोल भरण्यापासून सुटका होणार आहे.

या योजनेचा सर्वात जास्त फायदा रोज ऑफिस आणि बिझनेस ट्रॅव्हल करणाऱ्या लोकांना होणार आहे. जे लोक नेहमी लॉन्ग ड्राईव्ह अथवा रोड ट्रिप्सवर जातात. त्यांच्यासाठी हा उत्तम पर्याय आहे. ही योजना केवळ पैसे वाचवणार नाही, तर वेळ इंधनही वाचवणार आहे. त्याशिवाय टोल नाक्यावर होणारे वाद, चुकीची टोल कपात आणि रिफंडसारख्या समस्याही खूप प्रमाणात कमी होतील.



### योजनेची मुख्य वैशिष्टे

- एकदा ३ हजार भरल्यानंतर पूर्ण वर्ष टोलसाठी वारंवार पेमेंट करण्याची गरज नाही.
- हा पास राष्ट्रीय हायवेवरील सर्व टोल नाक्यासाठी लागू असेल.
- वेळ आणि इंधन बचत-टोल नाक्यावर अधिक वेळ थांबून इंधन वाया जाणे थांबेल. लांब रांगा आणि कॅश पेमेंटची अडचण कमी होईल.
- स्थानिक प्रवासात लाभदायक - ६० किमी अंतरात येणाऱ्या-जाणाऱ्यांना वारंवार टोल देण्याची गरज नाही. त्यामुळे रोज प्रवास करणाऱ्या खासगी वाहन धारकांना त्याचा फायदा होईल.
- एका दिवसात कितीही करा प्रवास - बऱ्याचदा टोल नाक्यावर २४ तासांत रिटर्न येणाऱ्यांना टोलमधून काही सूट दिली जाते. मात्र या पासामुळे दिवसभरातून कितीही वेळा टोलमधून प्रवास करता येईल; परंतु वर्षाला २०० हून अधिक वेळा टोल क्रॉस करता येणार नाही, अशी अट आहे.

### पास घेण्याची प्रक्रिया कशी असेल?

वार्षिक पास घेणे खूप सोपे आहे. सरकारची ही नवी योजना असल्याने एनएचएआय आणि मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट ॲण्ड हायवे यांच्या वेबसाईटवर आणि हायवे ट्रॅव्हल ॲपवर नवीन पोर्टल सुरू केले जाईल. तिथून लोक ऑनलाईन अर्ज करू शकतील. तिथून तुमच्याकडे असलेल्या फॉस्टटॅग अकाऊंटशी लिंक करता येईल.

# हिंदीची सक्ती नाही... तिसरी पर्यायी भाषा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्टीकरण

◆ **मुंबई (विशेष प्रतिनिधी):**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार त्रिभाषा सूत्र संपूर्ण देशाने स्वीकारले आहे. या धोरणानुसार तीन भाषा शिकणे अनिवार्य आहे. त्यापैकी एक मातृभाषा असेल दुसरी स्वाभाविक इंग्रजी भाषा आपण स्वीकारलेली आहे आणि त्यानंतर कोणतीही तिसरी भारतीय भाषा शिकण्याचा पर्याय हा विद्यार्थ्यांना देण्यात आला आहे. त्यामुळे राज्य सरकारने कोठेही हिंदी भाषा सक्तीची केलेली नाही असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी पत्रकारांशी बोलताना केले.

मुख्यमंत्री फडणवीस याबाबत म्हणाले की, सुरुवातीला तिसरी भाषा म्हणून राज्य सरकारने हिंदी भाषेचा उल्लेख केला होता. कारण हिंदी भाषेसाठी शिक्षक मुबलक प्रमाणात उपलब्ध होतात. तथापि राज्य सरकारच्या या निर्णयाला विरोध झाल्याने राज्य सरकारने आता हिंदीची अनिवार्यता काढून टाकली आहे आणि त्या ऐवजी कोणतीही भारतीय भाषा विद्यार्थ्यांना शिकता येईल मग ती हिंदी देखील असू शकते फक्त याकरता जी भाषा शिकायची असेल त्यासाठी किमान २० विद्यार्थी असले पाहिजेत, तर त्याला त्या भाषेचा शिक्षक उपलब्ध करून दिला जाईल असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले जर वीसपेक्षा कमी विद्यार्थी असतील, तर ती भाषा शिकण्यासाठी ऑनलाईन भाषा शिकवण्याची व्यवस्था केली जाईल असेही मुख्यमंत्र्यांनी याबाबत अधिक बोलताना सांगितले.

तिसरी भाषा म्हणून राज्य सरकारने आज काढलेल्या शासन निर्णयात हिंदी भाषेच्या उल्लेखावरून मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी हिंदी सक्तीला विरोध केला होता. त्याबाबत पत्रकारांनी मुख्यमंत्र्यांना विचारले असता, ते म्हणाले की संपूर्ण देशाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वीकारलेले आहे. त्रिभाषा सूत्र हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

# 'अनुकंपा' नियुक्ती हा अधिकार म्हणून पाहू नये

### सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

◆ **नवी दिल्ली (प्रतिनिधी):**

सर्वोच्च न्यायालयाने अनुकंपा नियुक्तीबाबत मोठा निर्णय दिला आहे. मंगळवारी, सर्वोच्च न्यायालयाने वडिलांच्या मृत्यूनंतर एका तरुणाला नोकरी देण्यास नकार दिला आहे. ज्याच्याकडे एकापेक्षा जास्त घरे आणि अनेक एकर जमीन आहे. याचिकाकर्ता त्याच्या वडिलांच्या मृत्यूनंतर अनुकंपा नियुक्तीची मागणी करत होता. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी असेही म्हटले आहे की अनुकंपा नियुक्ती हा अधिकार म्हणून पाहू नये. तसेच, उमेदवारांनी अशा नियुक्तीसाठी आवश्यक निकष पूर्ण करणे बंधनकारक आहे.

न्यायालयाने म्हटले आहे की याचिकाकर्ता रवी कुमार जेफ यांचे वडील केंद्रीय उत्पादन शुल्कात प्रधान आयुक्त होते. त्यांचे ऑगस्ट २०१५ मध्ये निधन झाले. आता रवी यांनी सीजीएसटी आणि केंद्रीय उत्पादन शुल्क (जयपूर झोन) राजस्थानमध्ये मुख्य आयुक्त कार्यालयात अनुकंपा नियुक्तीची मागणी केली आहे. न्यायमूर्ती उज्जल भुईयान आणि न्यायमूर्ती मनमोहन यांनी याचिका फेटाळली आहे. विशेष म्हणजे याचिकाकर्त्याच्या वडिलांनी दोन घरे, ३३ एकर जमीन आणि कुटुंबाला ८५ हजार रुपये मासिक पेन्शन सोडले आहे. अनुकंपा नियुक्तीसाठी रवी यांची याचिका राजस्थान उच्च न्यायालय आणि केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाने फेटाळली.



विभागीय समितीने अनुकंपा नियुक्तीसाठी १९ अर्जदारांची नावे विचारात घेतल्याचे वृत्त आहे, त्यापैकी फक्त ३ जणांना पात्र मानले गेले. विभागाचे म्हणणे आहे की अनुकंपा नियुक्तीला हक्क म्हणून पाहिले जाऊ नये. अशा नोकरीच्या दाव्यांचा विचार फक्त कुटुंबाला अडचणी येत असतील तरच केला जातो. समितीने म्हटले आहे की, 'मृत सरकारी कर्मचाऱ्याच्या कुटुंबात त्याची पत्नी, मुलगा आणि मुलगी यांचा समावेश आहे. मुलगा आणि मुलगी दोघेही बेरोजगार आहेत आणि त्यांचे लग्न झालेले नाही. कुटुंबाचे गावात घर आहे, ३३ एकर शेती जमीन आहे, कुटुंबाला ८५ हजार रुपये मासिक पेन्शन मिळत आहे. कुटुंबाचे मासिक उत्पन्न त्यांच्या उदरनिर्वाहासाठी तसेच सामाजिक जबाबदाऱ्यांसाठी पुरेसे असल्याचे दिसते.'

# भारतीय हवाई दलाला मिळणार 'स्मार्ट वेपन'

◆ **नवी दिल्ली (प्रतिनिधी):**

भारतीय हवाई दलाला लवकरच स्वदेशी स्मार्ट अँटी-एअरफील्ड वेपनची प्रगत आवृत्ती मिळणार आहे. हे शस्त्र एसयू-३० एमकेआयसह हवाई दलाच्या जवळजवळ सर्व लढाऊ विमानांच्या ताफ्यावर बसवता येईल. या शस्त्रामुळे हवाई दलाची ताकद आणखी वाढेल.

स्मार्ट अँटी-एअरफील्ड वेपन (एसएएडब्ल्यू) हा एक प्रकारचा बॉम्ब आहे, जो हवेतून सोडला जातो. एसएएडब्ल्यू १०० किलोमीटर अंतरावरही अचूकतेने लक्ष्य गाठू शकतो. हा बॉम्ब उपग्रहाद्वारे निर्देशित केला जातो. या बॉम्बसाठी भारतीय हवाई दलाच्या प्रस्तावावर लवकरच संरक्षण मंत्रालयाकडून चर्चा होण्याची अपेक्षा आहे.

### हवेतून १०० किमी मारा करेल 'एसएएडब्ल्यू'

हा बॉम्ब स्वदेशी पद्धतीने विकसित आणि डिझाइन केला आहे आणि त्याचे वजन १२० किलो आहे. एसएएडब्ल्यू हे हैदराबाद येथील डीआरडीओच्या संशोधन केंद्र येथे स्वदेशी पद्धतीने डिझाइन आणि विकसित केले गेले आहे. त्याचा उद्देश शत्रूच्या एअरबेसमध्ये असलेले रडार, बंकर, धावपट्टी, टॅक्सी ट्रॅक इत्यादी गोष्टी क्षणार्धात नष्ट करणे आहे.

# अरण्यऋषी, प्रतिभावंत लेखक मारुती चित्तमपल्ली यांचे निधन

◆ **सोलापूर (प्रतिनिधी):**

प्रतिभावंत लेखक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पक्षिशास्त्रज्ञ व वन्यजीव अभ्यासक, अवघे जीवन वनविद्येचा अभ्यास आणि लेखनासाठी समर्पित करणारे व्यासंगी संशोधक व वनाधिकारी मारुती चितमपल्ली यांचे सोलापुरात बुधवारी सायंकाळी निधन झाले. ते ९३ वर्षाचे होते.

दरम्यान, ३० एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्यानंतर दिल्लीतून परतल्यापासूनच त्यांची प्रकृती चिंताजनक होती. अखेर, आज संध्याकाळी ७ च्या सुमारास सोलापुरातील राहत्या घरी त्यांचे निधन झाले.



मारुती चित्तमपल्ली यांनी सोलापुरातील टी. एम. पोरे स्कूल व नॉर्थकोट टेक्निकल हायस्कूलमधून शालेय शिक्षण आणि दयानंद महाविद्यालयातून उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढील व्यावसायिक शिक्षण स्टेट फॉरेस्ट कॉलेज, कोईमतूर आणि बंगळुरु, दिल्ली, कान्हा राष्ट्रीय उद्यान (मध्य प्रदेश), डेहराडून येथील वने आणि वन्यजीवविषयक संस्थांमधून घेतले. नांदेड येथील संस्कृत पाठशाळेत तसेच पुणे, पनवेल येथील संस्कृत पंडितांकडे संस्कृत भाषेचे व साहित्याचे अध्ययन केले. जर्मन व रशियन भाषांचाही त्यांनी अभ्यास केला. महाराष्ट्र शासनाच्या वनविभागात त्यांनी ३६ वर्षे सेवा केली. त्या काळात देशभर संशोधकवृत्तीने भटकंती केली. त्यांनी एकूण ५ लाख किमी प्रवास केला. मारुती चितमपल्ली यांना १३ भाषांचे ज्ञान होते.

# ...तर अमेरिकेला परिणाम भोगावे लागतील

### इराणच्या अयातुल्ला खोमेनींची डोनाल्ड ट्रम्प यांना धमकी



◆ **तेहरान (वृत्तसंस्था):**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला बिनशर्त शरणागती पत्करण्यास सांगितले होते. यावर आता इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खोमेनी यांनी प्रत्युत्तर दिले आहे. इराण लादलेली शरणागती किंवा शस्त्रसंधी स्वीकारणार नाही. तसेच अमेरिकेने आमच्यावर लष्करी कारवाई केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा इराणच्या अयातुल्ला खोमेनी यांनी सांगितले आहे.

अयातुल्ला खोमेनी यांनी बुधवारी राष्ट्रीय टीव्ही वाहिनीवर देशाला संबोधित करताना हे विधान केले. शुक्रवारी इस्त्रायलने इराणच्या आण्विक तळांवर हल्ला केल्यानंतर खोमेनींनी पहिल्यांदाच जाहीर संबोधन केले आहे. ते म्हणाले, "झायोनिस्ट राजवटीने मोठी चूक केली आहे. याचे परिणाम भोगण्याची त्यांनी आता तयारी ठेवावी. आमच्या हवाई क्षेत्रात झालेले उल्लंघन आम्ही माफ करणार नाही. तसेच आमच्या शहिदांनी वाहिलेले रक्तही वाया जाऊ देणार नाही."

अयातुल्ला खोमेनी पुढे म्हणाले, "इराणमधील लोकांना आणि इराणच्या इतिहासाला ओळखणारे लोक कधीही इराणशी अशा धमकीच्या भाषेत बोलू शकत नाहीत. कारण इराणी लोक शरणागती पत्करणाऱ्यांमधील नाहीत. ज्या लोकांनी आमच्यावर युद्ध लादले, त्यांच्याविरोधात आम्ही पूर्ण ताकदीने उभे राहू. तसेच आमच्यावर शांती लादणाऱ्यांचाही आम्ही विरोध करतो. कोणत्याही प्रकाराच्या दबावापुढे इराण झुकणार नाही." इराण आणि इस्त्रायल यांच्यातील संघर्ष आज सहाव्या दिवशीही सुरूच आहे. हा संघर्ष कमी होण्याची कोणतीही चिन्हे सध्या तरी दिसत नाहीत. त्यामुळे पुढील घडामोडींकडे जगाचे लक्ष लागून राहिले आहे. इराणला कोणत्याही परिस्थितीत अण्वस्त्रे तयार करू देणार नाही, असा इस्त्रायलचा निश्चय आहे. त्यामुळेच इराणच्या आण्विक ठिकाणांवर हल्ले करण्यात आले होते. यामुळे इराण अधिकच खवळला आहे. दोन्ही देशांत तुफान हल्ले सुरू आहेत.

## तुकाराम महाराजांच्या ३४० पालखी सोहळ्याची सुरुवात

# देहूतून तुकोबारांयांच्या पालखीचे प्रस्थान

◆ **देहूगाव (प्रतिनिधी):**

टाळ-मृदंग वाजती, वीणा झंकारती, वरुण राजाचा अभिषेक होऊनी, तुकोबांच्या अंगणी वैष्णव नाचती, अशी अपूर्व अनुभूती इंद्रायणी तीरावरील देहूनगरीत आली. वैष्णवांच्या अभूतपूर्व उत्साहात संतश्रेष्ठ जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या ३४० पालखी सोहळ्याने आषाढीवारीसाठी श्रीश्रेत्र देहूगाव येथून भूवैकुंठ पंढरीकडे बुधवारी सायंकाळी प्रस्थान केले. "होय, होय वारकरी, पाहे पाहे पंढरी...' अशी विठूरायाच्या भेटीची आर्तता वैष्णवांठायी दिसून आली.

यंदा जोरदार पावसाचे आगमन झाल्याने आषाढीवारीस येणाऱ्या वैष्णवांचा उत्साह अपूर्व होता. देहूनगरीत बुधवारी भक्ती चैतन्याचे पसरले होते. इंद्रायणीला तर पाण्याबरोबरच भक्तीचा महापूर आला होता. आषाढीवारीसाठी मंगळवारी सायंकाळीच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून दिंडेकरी, दिंड्या, फडकरी, वारकरी देहूनगरीत दाखल झाले होते. पालखी प्रस्थान सोहळा आज असल्याने भल्या सकाळीच वारकऱ्यांनी इंद्रायणी नारायण महाराजांच्या समाधिची व सात वाजता वैंकुठगमण मंदिरात महापूजा संस्थानचे विश्वस्थांच्या हस्ते झाली.



### मुख्यमंत्र्यांसह मान्यवरांची उपस्थिती

ऊन सावल्यांचा खेळ सुरू झाला. प्रस्थानाची वेळ समिप येऊ लागल्याने मुख्यमंदिरात दिंड्या जागा घेऊ लागल्या. आसमंती भगव्या पताका फडकावीत वैष्णवांची पावले मंदिराच्या दिशेने पडू लागली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वेगळेच चैतन्य होते. अडीचच्या सुमारास प्रस्थान सोहळ्यास सुरुवात झाली. सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार श्रीरंग बारणे, सुनेत्रा पवार, आमदार महेश लांडगे, सुनील शेळके, अमित गोरखे, शंकर जगताप, उमा खापरे, माजी मंत्री बाळा भेगडे आदी उपस्थित होते. दुसरीकडे मंदिर आवारात मानाचे अश्व दाखल झाले, तर देहूकर दिंडीने 'ज्ञानोबा तुकाराम' या तालावर टाळ-मृदंग कल्लोळ आणि वीणेचा झंकार करायला सुरुवात केली. दुसरीकडे वीणामंडपात महापूजा झाली. देहू संस्थानाच्या वतीने मानकऱ्यांचा आणि दिंडेकऱ्यांचा सन्मान केला. नभांगणी ऊन सावल्यांचा, तर तुकोबांच्या अंगणी वैष्णवांनी खेळ मांडल्याचे दिसून आले. तसेच मुख्यमंत्र्यांनी आमदारांबरोबर फुगडी खेळली.

## अभिजात भाषेचा दर्जा

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. केंद्रातील मोदी सरकारच्या काळात हा निर्णय घेण्यात आला. तसे पाहायला गेले, तर बाराव्या शतकापासून वारसा सांगणारी मराठी भाषा ही किती जुनी आहे, हे पटवून देण्यासाठी अनेक दाखले केंद्र सरकारला सादर करावे लागले. मराठी भाषा ही अभिजात झाली, पण आज महाराष्ट्रातील खेड्यापाड्यापासून शहरांपर्यंत मराठी जनांना मराठीचा किती भाषिक अभिमान आहे, याचे आता कुणी सर्वेक्षण केले, तर मराठी माणसेच व्यवहारात हिंदी भाषेचा अधिक वापर करत असल्याचे दिसून येईल. मुंबईसह मोठ्या शहरात बाजारात दुकानदाराशी बोलताना, रिक्षाचालक, टॅक्सी चालकाशी संवाद साधताना मराठीऐवजी हिंदीत बोलण्याचा कल असतो. आता या प्रवृत्तीला सरकार काय करणार? दोन व्यक्तींमधील संवाद हा मातृभाषेत असावा की, अन्य भाषेत असावा हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे; परंतु अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर, मराठीत बोला, अशी चळवळ कुठे उभी राहिल्याचे ऐकिवात नाही. मात्र, शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषेवरून सध्या वाद सुरू झाला आहे तो दुर्दैवी आहे. मराठीच्या मुद्द्यांवरून आग्रही असलेल्या मनसेने आता शालेय शिक्षणातील हिंदी भाषेवरून राजकीय वातावरण तापविण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत योग्य आहे?, खरंच शाळेतील अभ्यासक्रमात हिंदी भाषा असली, तर मराठीचा अपमान होणार आहे का? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, याचा समस्त मराठी जनांनी विचार करायला हवा. राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याच्या निर्णयाला मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी कडाडून विरोध केला आहे. उत्तरेतील लोकांना सुसंस्कृत महाराष्ट्र काबीज करायचा आहे. त्यासाठी आयएएस अधिकाऱ्यांच्या लॉबीकडून महाराष्ट्रात हिंदीची सक्ती करण्यासाठी दबाव आणला जात आहे, असा आरोप मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी केला आहे. या आरोपामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मराठी-हिंदी असा भाषेचा नव्याने वाद सुरू झाला आहे. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेली भूमिका महत्त्वाची आहे. तिसरी भाषा म्हणून हिंदीला मान्यता दिली म्हणजे मराठीचा अपमान होतो, असा प्रचार करणे चुकीचे आहे. त्रि भाषेचे सूत्र नवीन शैक्षणिक धोरणात आहे, त्यामध्ये मातृभाषा अनिवार्य असून त्या व्यतिरिक्त दोन भाषा असून त्यातील एक भारतीय भाषा असली पाहिजे, असे नमूद केले आहे. आधी महाराष्ट्र सरकारने हिंदी भाषा अनिवार्य केली होती. मात्र, जीआर काढून त्यातील अनिवार्यता हा शब्द काढून टाकलेला आहे. कुठलीही तिसरी भारतीय भाषा विद्यार्थ्यांना शिकता येईल. त्यात हिंदी भाषेचा समावेश आहे, स्वाभाविकपणे लोक आपल्याकडे इंग्रजी स्वीकारतात, त्यामुळे कुठलीही तिसरी भारतीय भाषा शिकणे गरजेचे आहे, असे स्पष्टीकरण देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. आता एकच गोष्ट आपल्या सगळ्यांना माहीत आहे की, इंग्रजी ही जगाची भाषा मानून सर्वत्र तिचा आपण पुरस्कार केला आहे. इंग्रजी ही व्यवहारभाषा असल्यामुळे त्याचे कौतुक करायला हरकत नाही; परंतु भारतीय भाषांचा तिरस्कार करणे योग्य आहे का ? भावनिक साद घालणाऱ्या भारतीय भाषा या इंग्रजीपेक्षा चांगल्या आहेत, याचा विचार आपण करणार आहोत की नाही?. नवीन शैक्षणिक धोरणाने सर्वात महत्त्वाचे काम जे केले ते म्हणजे मराठीला ज्ञानाभाषा बनवण्याचा मार्ग खुला केला आहे. महाराष्ट्रात आपण इंजिनिअरिंग (अभियांत्रिकी) हे मराठीत शिकवायला लागलो आहोत, जे यापूर्वी कधीच घडले नव्हते. नवीन शैक्षणिक धोरणामुळे वैद्यकीय क्षेत्रात आपले डॉक्टर तयार होणार आहे, ते मराठीत शिक्षण घेऊ शकतात. एवढंच नव्हे तर एमबीएचे शिक्षणदेखील मराठीत शिकता येईल, असे दालन राज्य सरकारकडून उघडले असेल, तर मराठी भाषेबद्दल राज्य सरकारला आदर राहिलेला नाही, असा युक्तीवाद जर कोणी करत असेल, तर तो मुर्खपणा समजायला हवा. मराठी भाषा, मराठी साहित्याबाबत नव्या पिढीला सजग करणे हे जितकी सरकारची जबाबदारी आहे त्यापेक्षा मराठी पालकांची आहे. घराच्या चार भिंतीत मराठी बोलून चालणार नाही, तर प्रत्येक मराठी माणसांने संवादासाठी जास्तीत जास्त मराठी भाषेचा वापर करायला हवा. चीन, जपान या देशात त्यांच्या स्थानिक भाषांना महत्त्व दिले जाते. देशाबाहेर कशाला? जरा दक्षिणेत भ्रमंती करून आलेल्या माणसांना विचारा, त्या-त्या राज्याची भाषा ही किती मोठी आहे याची कल्पना येते. त्याठिकाणी प्रादेशिक भाषेचा वापर केला जातो. मुंबई, महाराष्ट्रात मराठी माणसाने हिंदी भाषेला आधीच मावशीचा दर्जा देऊन ठेवला आहे, तर मग आता हिंदीचा तिरस्कार करणे कितपत योग्य आहे. मुंबईत उत्तर भारतीयांची गेल्या तीन दशकांत वाढलेली लोकसंख्या पाहता, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हिंदी भाषिक होईल असे विधीमंडळात दबक्या आवाजात काँग्रेस सरकारच्या काळातही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून निवडून आलेले लोकप्रतिनिधींकडून दबक्या आवाजात बोलले जात असे. हा ९० च्या दशकातील किस्सा असला तरी, आज २०२५ साल उजडल्यानंतर, आपण काय शिकलो याचा विचार प्रत्येक मराठी माणसाने करायला हवा. फेरीवाल्यांपासून, लॉन्ड्रीचे कपडे देण्यासाठी आपल्याला उत्तर भारतीय लागतो. कारण मराठी माणसांना अंगमेहनतीचे काम करणे हे कमीपणाचे वाटते. एक उदाहरण म्हणून पाहिले, तर एका कॉलनीतील मराठी कुटुंबीयांनी त्यांची कामे उत्तर भारतीय व्यक्तीकडून करून घेण्यास हरकत नाही. पण, त्याची व्यवहारीक बोलताना मराठीचा हट्ट धरला तरी, तो उत्तर भारतीय मराठी भाषा

# छत्रपती शिवाजी महाराज देशाचा गौरव

## जनार्दन पाटील:दिल्लीत शिवस्वराज भवन उभारणार



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज हे या महाराष्ट्राचे नाही तर देशाचा गौरव आहे.दिल्लीत महाराष्ट्राचा सन्मान वाढला पाहिजे. यासाठी मी प्रयत्नशील असून महाराष्ट्रातील शिवप्रेमींनी शिवरायांचा आदर्श अंगीकारला पाहिजे असे प्रतिपादन विश्वभूषण राजे शिवछत्रपती चेतना यात्रा चे प्रमुख जनार्दन पाटील यांनी केले.ते परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, देशभरात शिवरायांच्या नावाने एक लाखापेक्षा अधिक संस्था आहेत. परंतू त्यांच्यात देशपातळीवर समन्वय नाही.समन्वयाचा अभाव असल्याने महाराष्ट्राचे दिल्लीत जसे असायला हवे तसे स्थान नाही.तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, गुणवंतांचा, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते यांचा दिल्लीत गौरव करण्याचा संकल्प व्यक्त केला.तसेच देशपातळीवर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली कार्याचा प्रसार करण्यासाठी ही संघटना काम करत आहे.

महाराष्ट्राचा गौरव देशात वाढला पाहिजे.याकरिता अराजकीय उद्देशाने फुले शाहू आंबेडकरी, कल्याणकारी, मानवतावादी विचार लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी दिल्लीत विश्व भूषण राजे शिवछत्रपती चेतना संघटना काम करत आहे. सदर संघटना देशात १४ राज्यात कार्यरत आहे.लातूरचे खा. डॉ शिवाजीराव काळगे यांचे ही सहकार्य मार्गदर्शन घेऊन. दिल्लीत श्रीमंत शाहू छत्रपती महाराज कोल्हापूर यांच्या हस्ते लवकरच दिल्लीत प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात येणार असल्याचेही जनार्दन पाटील यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला मराठा सेवा संघाचे संजय सुरवसे, ज्येष्ठ पत्रकार आंबा गायकवाड, धनंजय आरबुने , संपादक नितीन ढाकणे, श्रीराम लांडगे, भगवान साकसमुद्रे, बबलू शर्मा, एस के गित्ते, सुकेशनी नाईकवाडे, ओमप्रकाश बुरांडे आदी उपस्थित होते.

# नगर परिषद निवडणूकीचे पडघम!

## राजकीय:लोणार शहर काँग्रेस कमिटीची बैठक

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:आज दिनांक १९ जून २०२५ रोजी हॉटेल अथर्व रेस्टॉरंट येते लोणार शहर काँग्रेस श्र कमिटीच्या वतीने नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने होणाऱ्या प्रभाग रचना सुरू होत आहे त्यामुळे प्रभाग रचना निवडणूक आयोगाच्या नियमानुसार होत आहे किंवा नाही याबाबत सर्वांनी लक्ष ठेवावे या अनुषंगाने लोणार शहर काँग्रेस कमिटीची बैठक आयोजित केली होती. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांच्या सूचनेनुसार व बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल भाऊ बोंद्रे यांच्या आदेशाने होऊ घातलेल्या नगरपालिकेच्या प्रभाग रचना बाबत व सदस्य अभियान नोंदणी साठी बैठक लोणार शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख समद शेख अहमद यांनी बैठक आयोजित केली होती या बैठकीचे अध्यक्षस्थानी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शांतीलाल गुगलीया होते तर प्रमुख म्हणून माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव फुके, माजी जिल्हा सरचिटणीस साहेबराव पाटोळे, माजी नगराध्यक्ष भूषण मापारी, ज्येष्ठ नेते प्रदीप संचेती, लोणार तालुका अध्यक्ष अश्रू फुके, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष प्राध्यापक गजानन खरात,युवक काँग्रेस जिल्हा अध्यक्ष अनिकेत मापारी,अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष तोफिक कुरेशी, माजी नगरसेवक शेख करामत शेख गुलाब, उपस्थित होते यावेळी साहेबराव पाटोळे, केशवराव फुके, तोफिक कुरेशी, अश्रू फुके, यांनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी माजी नगरसेवक शेख रहुप शेख मेहबूब, माजी नगरसेवक संतोष मापारी, माजी नगरसेवक प्राध्यापक सुदन कांबळे, माजी नगरसेवक रमजान परसु वाले, माजी नगरसेवक अंबादास इंगळे, माजी नगरसेवक पंढरी चाटे, माजी नगरसेवक शंकर हेंद्रे, माजी नगरसेवक अरुण जावळे, शेख असलम शेख कासम, मजीद कुरेशी, शहर काँग्रेस उपाध्यक्ष रामचंद्र कोचर, उपाध्यक्ष शहर गजानन मापारी, युवक काँग्रेस शहर अध्यक्ष विकास मोरे,युवक काँग्रेस विभागीय अध्यक्ष भारत राठोड, सरचिटणीस फयास खान,शहर सरचिटणीस शेख अजमत शेख अनामत, शेख अफसर शेख तुराब,एजाज खान, रहमान नोरंगाबादी, काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक गजानन खरात यांनी केले तर आभार शेख समद यांनी मानले.

पान सहा वरुन

### सशालेय साहित्या

पोहोचला पाहिजे यासाठी शाळेने पुढे येणे आवश्यक आहे. याबाबत धारूर गटशिक्षण अधिकाऱ्यांना जैतापूरचे सरपंच भागवत दराडे यांनी मगळवोरी निवेदन देत मागणी केली. इंग्रजी शाळांकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल रोखायचा असेल तर जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी सतर्क होत विद्यार्थ्यांच्या भौतिक व शैक्षणिक गरजा पुरवणे आवश्यक असल्याचे भागवत दराडे यांनी माध्यमांना बोलताना सांगितले.भागवत गव्हाणे, धूनकवड ,अविनाश कांदे, जहागीर मोहा,राहुल तोंडे सोनीमोहा सरपच आदी सरपंच मंडळी याप्रसंगी गट शिक्षण अधिकारी कार्यालयात उपस्थित होती.

### झेडपी केंद्रीय शाळेत

शिक्षकवृंद व शिक्षिका उपस्थित होत्या.शैक्षणिक साहित्याच्या वाटपामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन उमेद व प्रेरणा निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची नितांत आवश्यकता असल्याचे मत वसिमा शेख मॅडम यांनी व्यक्त केले.पालक वर्गानेही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत शाळेच्या कार्याची स्तुती केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवर्ग आणि शाळा व्यवस्थापन समितीने अथक परिश्रम घेतले.

### रिपाइं निराधारांसाठी

उपोषण करण्यात आले. याप्रसंगी तहसील कार्यालय व पंचायत समिती विभागाच्या प्रतिनिधींनी उपोषणस्थळी भेट देऊन आठ दिवसात थकीत मानधन व घरकुलाचे हप्ते देण्यात येतील. असे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

### दुचाकीला कारची

दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना पुढील उपचारार्थ अहिल्यानगरला हलविण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. अपघातस्थळी पोकॉ मजहर सय्यद, वाहन चालक पोहेकॉ प्रताप घोडके यांनी तातडीने भेट दिली.

### योजनेसाठी बेमुदत

अन्याय असून अनुसूचित जातीच्या वस्त्या विकासापासून वंचित राहत आहेत त्यामुळे अनुसूचित जाती राखीव प्रभागाच्या सर्वांगीन विकासासाठी नगर परिषद निवडणूकीच्या आचारसंहितेपूर्वी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ अंतर्गत मंजूर निधी नगर परिषद बीड ला देऊन सदरील प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत जिल्हाप्रशासनास सूचित करूनअनुसूचित जाती प्रभागातील विकासकामे जलद गतीने पूर्ण करण्यात यावे या मागणीसाठी दिनांक २ जुलै २०२५ पासून लोकशाही मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून जेष्ठ माजी नगरसेवक भिमराव वाघचौरे,ड विकास जोगदंड, माजी नगरसेविका सौ.पुजा गणेश वाघमारे, सौ.रत्नमाला बाबुराव दुधाळ, सौ.मिना बिबिशन लांडगे सह आदींच्या शिष्टमंडळाने दिला आहे.

### मदन महाराज

करमाळा, टेंभुर्णी, विठ्ठल साखर कारखाना मार्गे पंढरपूरला ही दिंडी पोहोचते. दिंडीत मोठ्या संख्येने भाविक सहभागी होत असतात.

### स्टेट बँकेकडून

दिन आहे. यानिमित्त बँकेच्या कडा शाखेत मंगळवारी दि. १७ जून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अहिल्यानगर येथील अर्पण ब्लड बँकेच्या सहकार्याने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात बँकेचे कर्मचारी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्त्यांसह पन्नास बँक खातेदारांनी आपला सहभाग नोंदवला. सदर रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी बँकेचे शाखा व्यवस्थापक नवनाथ शेळकेसह त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. बँकेच्या या स्तुत्य उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे.

### योग दिनानिमित्त वृक्षारोपण

माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिली याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले, ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ हा आंतरराष्ट्रीय योग दिनास येत्या शनिवारी २१ जून २०२५ रोजी एक दशक पूर्ण करीत आहे.या निमित्ताने देशात विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत. हे उपक्रम १० विशेष कार्यक्रमांमध्ये विभागलेले आहेत.या अनुषंगाने कार्यक्रम क्रमांक १ - योग संगम मध्ये योग संगम किंवा मुख्य आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रम दि.२१ जून २०२५ रोजी सकाळी ६:३० ते ७:४५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमांची जिल्ह्याच्या सामाजिक माध्यमांद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी असे आवाहन असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) राजेंद्र देसले यांनी केले आहे.

### प्रियदर्शनीसह कन्या

माजी नगरसेवक संदीप जाधव, श्रीमती.अडागळे, श्रीकांत लांडगे, आशा जाधव, श्रीमती.कदम, पालक प्रतिनिधी भीमराव घोलप, भास्कर मिसाळ, ज्ञानेश्वर चापकानडे, श्रीमती.बनगे, शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक पवनकुमार मोरे, श्रीकांत लांडगे, बबन राख, पोपट उगले, संकेत माताडे, जयश्री शेलार, नवनाथ ठाकणे, अनिल राख, प्रताप नवले, रवि काळे, मुळे, अविनाश तिडके यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम शाळेच्या वर्धापन दिनाच्या औचित्य साधून आयोजित केला होता. तसेच, शहरातील प्रियदर्शनी कन्या प्रशालेतील मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी बप्पासाहेब जाधव होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ.क्षीरसागर यांच्यासह नगराध्यक्षा दीपाली जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी तालुकाध्यक्ष शिवभूषण जाधव, बीड जिल्हा पत्रकार संघाचे पाटोदा तालुकाध्यक्ष ड.महेश बेदरे, वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आबासाहेब हंगे, ड.तात्यासाहेब तवार, संदीप जाधव, जवाद शेख, मुन्ना शिंदे, सचिन गायकवाड, शाळेचे मुख्याध्यापक सचिन खोले, शिक्षक नवनाथ ढाकणे, दहिफळे आदींची उपस्थिती होती. यावेळी दहावी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थिनी प्राप्ती घुमरे, देविका जाधव, बांगर, सय्यद शेख गौरव करण्यात आला. गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच मुलींच्या सुरक्षिततेलाही आम्ही प्राधान्य दतो. डॉक्टर, इंजिनिअरच्या पलीकडेही मुलींनी स्पर्धा परीक्षा, प्रशासन व इतर विविध क्षेत्रांकडे वळावे यासाठी शाळेत योग्य मार्गदर्शन दिले जाते. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे. पालकांनी केलेल्या सुचनांचे आम्ही काटेकोरपणे पालन करुन अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी दिली.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अँन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# महिमा एकादशीचा



एकादश्यां निराहारः
स्थित्वाद्याहं परेऽहनि।
भोक्ष्यामि पुण्डरीकाक्ष
शरणं मे भवाच्युत॥
अज्ञानतिमिरान्धस्य
व्रतेनानेन केशव।
प्रसीद सुमुखो भूत्वा
ज्ञानदृष्टिप्रदो भव॥

**अर्थ :**

हे कमलनयन भगवान अच्युता, मी एकादशीच्या दिवशी निराहार राहून द्वादशीला अन्न प्राशन करतो. मी तुला शरण आलो आहे. हे केशवा, अज्ञानरूपी अंधारात अंध झालेल्या माझ्यावर या व्रताने प्रसन्न होऊन मला ज्ञानदृष्टी प्रदान कर.

'एकादशी' म्हणजे भारतीय कालगणनेनुसार दर महिन्यातील अमावस्येपासून अकरावी तिथी येणारा दिवस आणि पुन्हा पौर्णिमेपासून अकरावी तिथी येणारा दिवस. अशाप्रकारे महिन्यात दोन 'एकादशी' येतात. शुक्ल आणि कृष्ण पक्षातील एकादशी तिथीला 'हरिदिनी', असेही म्हणतात. ही विष्णूंची तिथी मानली आहे. हे व्रत शुक्ल आणि कृष्ण अशा दोन्हीही एकादशींना करतात. एकादशीत 'स्मार्त' आणि 'भागवत' असे दोन भेद आहेत. ज्या पक्षात हे दोन भेद संभवतील, त्यावेळी पंचांगात पहिल्या दिवशी 'स्मार्त' आणि दुसऱ्या दिवशी 'भागवत' असे लिहिलेले असते. हिंदू धर्मशास्त्रानुसार प्रत्येक एकादशी हा दिवस देवाला शुभ आणि अनुकूल दिवस मानला जातो आणि काही धार्मिक विचारसरणीचे लोक त्यांच्या शक्ती आणि आरोग्यानुसार एकादशीच्या दिवशी पूर्ण किंवा अंशतः उपवास करतात. एकादशीला एवढे महत्त्व प्राप्त होण्याचे कारण असे की, त्या तिथीला सर्व प्राणीमात्रांची गती उर्ध्व दिशेने झेपावते. प्रत्येक एकादशीचे आपले असे एक महत्त्व आहे. दर पंधरवड्यात येणाऱ्या एकादशीची नावे खालीलप्रमाणे आहेत. कामदा एकादशी, वरूथिनी एकादशी, मोहिनी एकादशी, अपरा एकादशी, निर्जला एकादशी, योगिनी एकादशी, देवशयनी (आषाढी) एकादशी, कामिका एकादशी, पुत्रदा एकादशी, अजा एकादशी, परिवर्तिनी एकादशी, इंदिरा एकादशी, पाशांकुशा एकादशी, रमा एकादशी, प्रबोधिनी एकादशी, उत्पत्ती एकादशी, मोक्षदा एकादशी, सफला एकादशी, पुत्रदा एकादशी, षट्तिला एकादशी, जया एकादशी, विजया एकादशी, आमलकी एकादशी, पापमोचनी एकादशी, कमला एकादशी, पद्मिनि एकादशी इत्यादी.

एकादशीच्या दिवशी उपवास करणे आणि भगवान विष्णूंची पूजा करणे हे खूप महत्त्वाचे मानले जाते. एकादशीचा उपवास निर्जला, क्षीरभोजी, फलहारी किंवा जलाहार या पद्धतीने केला जातो. निर्जला एकादशीला पाण्याशिवाय पूर्ण उपवास केला जातो.



**मनाचा गाभारा**
**अर्चना सरोदे**

एकादशीची एक पौराणिक कथा सांगितली जाते. सत्ययुगात एकेकाळी मूर नावाचा एक अद्‌भुत भयानक राक्षस राहत होता. त्याने शंकरांना प्रसन्न करून अमरत्वाचे वरदान मागून घेतले. नंतर त्याने देवतांशी युद्ध पुकारले. स्वर्गाचा राजा इंद्र, सूर्यदेव विवस्वान, आठ वसू, भगवान ब्रह्म, वायुदेव आणि अग्निदेव यांचा पराभव केला. त्याच्या भयानक शक्तीने त्याने त्या सर्वांना आपल्या अधिपत्याखाली आणले. मग देवतांनी महादेवांकडे जाऊन त्यांची मदत मागितली. शंकरांनी त्यांना भगवान विष्णूंकडे पाठवले. सर्व देवतांनी भगवान विष्णूंकडे जाऊन त्यांची प्रार्थना केली व त्यांची मदत मागितली. इंद्राची प्रार्थना आणि विनंती ऐकून भगवान विष्णू त्या मूर राक्षसावर खूप क्रोधित झाले आणि म्हणाले: "हे शक्तिशाली देवतांनो, आता तुम्ही सर्व मिळून मूराची राजधानी चंद्रवतीवर चाल करून जाऊ शकता." सर्व देवतांनी भगवान हरी यांच्या नेतृत्वाखाली चंद्रवतीवर चाल केली. त्यानंतर मूराच्या सैनिकांमध्ये आणि देवतांमध्ये मोठे युद्ध झाले. भगवानांच्या हातून हजारो राक्षस मारले गेले. शेवटी मुख्य राक्षस मूराने प्रथम शस्त्रांनी आणि नंतर उघड्या हातांनी परमेश्वराशी युद्ध सुरू केले. भगवान विष्णूंनी एक हजार स्वर्गीय वर्षे मूराशी युद्ध केले आणि नंतर ते थकले तेव्हा, ते विश्रांतीसाठी बदरिका आश्रमाला निघून गेले. तेथे ते हिमावती नावाच्या एका अतिशय सुंदर गुहेत राहिले. तिथे त्यांना निद्रा लागली. राक्षस त्यांच्या मागे मागे गुहेत गेला आणि त्यांना झोपलेले पाहून, तो मनात विचार करू लागला: "आज मी या हरिचा वध करीन," जेव्हा दुष्ट राक्षस मूर विष्णूंना मारण्यासाठी शस्त्र घेऊन त्यांच्यावर धावून गेला तेव्हा भगवान विष्णूंच्या शरीरातून एक सुंदर स्त्री प्रकट झाली जिचा रंग अतिशय तेजस्वी होता. मूराने पाहिले की ती विविध तेजस्वी शस्त्रांनी लढण्यास सज्ज आहे. त्या स्त्रीने युद्ध करण्याचे आव्हान दिल्यावर, मूराने स्वतःला युद्धासाठी सज्ज केले आणि नंतर तिच्याशी युद्ध करु लागला; परंतु ती स्त्री त्याच्याशी न थांबता लढत असल्याचे पाहून तो खूप आश्चर्यचकित झाला. राक्षसांचा राजा म्हणाला: "हे तेजस्वी शक्तिशाली देवी तुला कोणी निर्माण केली आहे जी तू माझ्यावर वीज कोसळत असल्याप्रमाणे लढत आहे, ?"

अचानक त्या तेजस्वी देवीने मूराची सर्व शस्त्रे तोडली आणि क्षणार्धात त्याचा रथ हिरावून घेतला. तो आपल्या उघड्या हातांनी तिच्यावर हल्ला करण्यासाठी तिच्याकडे धावला; परंतु जेव्हा तिने त्याला तिच्याकडे येताना पाहिले तेव्हा तिने क्रोधाने त्याचे डोके कापून टाकले. अशाप्रकारे राक्षसाचा वध झाला. इतक्यात भगवान विष्णू जागे झाले आणि त्यांनी मृत राक्षसाला त्या देवीसमोर हात जोडताना पाहिले. त्या देवीवर प्रसन्न होऊन भगवान विष्णूंनी तिला वरदान देण्याचे ठरवले आणि तिला वरदान मागायला सांगितले. ती देवी म्हणाली: "हे प्रभू, जर तुम्ही माझ्यावर प्रसन्न असाल आणि मला वरदान देऊ इच्छित असाल, तर या दिवशी उपवास करणाऱ्या व्यक्तीला सर्वात मोठ्या पापांपासून मुक्त करण्याची शक्ती मला द्या. मी अशी इच्छा करते की, श्रद्धेने आणि निष्ठेने उपवास करणाऱ्या व्यक्ती सर्व पापांपासून मुक्त होऊन त्यांना वैकुंठात स्थान मिळेल. भगवंतांनी म्हटले: "हे परमपूज्य देवी, तू जे मागितले आहेस ते मी तुला देत आहे. या जगातील माझे सर्व भक्त तुझ्या प्रगट दिनादिवशी निश्चितच उपवास करतील आणि अशा प्रकारे ते तिन्ही लोकांत प्रसिद्ध होतील आणि शेवटी माझ्या धामात येऊन राहतील. कारण तू, माझी दिव्य शक्ती, अस्ताच्या चंद्राच्या अकराव्या दिवशी तू प्रकट झाली आहेस म्हणून तुझे नाव एकादशी असे पडेल. जर एखाद्या व्यक्तीने एकादशीचा उपवास केला, तर मी त्याचे सर्व पाप जाळून टाकीन आणि त्याला माझे दिव्य धाम प्रदान करीन."

ब्रह्मवैवर्त पुराणात असे म्हटले आहे की, जो एकादशीच्या दिवशी उपवास करतो तो सर्व प्रकारच्या पापकर्मांच्या प्रतिक्रियांपासून मुक्त होतो आणि धार्मिक जीवनात प्रगती करतो. पद्मपुराणात म्हटले आहे की, एखाद्याने एकादशीचे कठोर पालन केले तर त्याची सर्व पापे नष्ट होतात आणि त्याला वैकुंठधाम अगदी सहजपणे प्राप्त होते.

# ब्रह्मर्षी भृगू



**महर्षीणा भृगुरहं**
**गिरामस्येकमक्षरम्।**
**गीता अ.१०,२५**

भगवद्‌गीतेच्या दहाव्या अध्यायात भगवंतांनी आपल्या विभूती सांगितल्या आहेत. भगवंत ज्यांच्यात प्रकर्षाने प्रकट होतात, त्या आपल्या विभूती होत, असे त्यांनी म्हटले आहे. "महर्षीणां भृगुरहं" (गी. अ. १०,२५) सर्व महर्षींमध्ये भृगुमहर्षींमध्ये मी आहे, असे जे भगवंत म्हणतात, त्यातूनच महर्षी भृगूंचे महात्म्य सिद्ध होते. भगवान विष्णूंचे जे चतुर्भुज स्वरूप आहे, त्यात त्यांच्या वक्षस्थळावर 'श्रीवत्स' म्हणून खूण आहे. ती खूण भगवान विष्णूंनी मोठ्या प्रेमाने, अभिमानाने धारण केली आहे, ब्रह्मा, विष्णू, महेश यांत श्रेष्ठ म्हणजे गुणातीत कोण आहे, हे पाहण्यासाठी भृगू महर्षींनी या तिघांची प्रचिती पाहिली. ब्रह्मा व महेश या दोघांना भृगूंच्या प्रचितीसाठी धारण केलेल्या उद्धटपणाचा खूप राग आला, पण विष्णुला भृगूंनी छातीवर लाथ मारूनही विष्णू न रागावता उलट भृगूंच्या पायाला लागले असेल म्हणून तो पाय चुरीत राहिले. अर्थातच विष्णू त्रिदेवांमध्ये त्रिगुणातीत, श्रेष्ठ ठरले. ते अजूनही आपल्या छातीवरची भृगूंच्या लाथेची खूण मिरवत असतात.



**भारतीय ऋषी**
**डॉ. अनुराधा कुलकर्णी**

अखिल मानवजातीचे जीवन कल्याणमय, तेजोमय करण्यासाठी अंगिरा, भृगु व अत्री हे ऋषीवर यज्ञाग्नीतूनच अवतरले. अंगिरांना अग्निपुत्र, भृगूंना वरुणपुत्र, तर अत्रींना ब्रह्मपुत्र म्हटले जाते. महर्षी भृगूंनी अरणींच्या घर्षणातून अग्नी निर्माण करण्याचा शोध सर्वप्रथम लावला. अग्नीच्या ज्वाला किंवा अग्नीचा आवाज या अर्थाच्या "भृग्'' या धातूपासून भृगू नाम बनले आहे. महर्षी भृगू हेचाक्षुष मन्वतरातील सप्तर्षींपैकी एक, ब्रह्माच्या मानस पुत्रांपैकी एक. भृगूंचे पालनपोषण वरुण व वरुणपत्नी चर्षणी यांनी केले म्हणून भृगूंना वरुणपुत्र वा चर्षणीपुत्र असेही म्हणतात. महर्षी भृगू आणि महर्षी अंगिरा यांनी अनेक संशोधनपर सत्कार्ये जोडीने केलेली दिसतात. त्यांनी असंख्य वनस्पतींच्या गुणधर्मांचे संशोधन करून कोणत्या औषधी वनस्पती कोणत्या रोगावर उपयुक्त आहेत, हे शोधून काढले. ते त्यांनी अथर्ववेदात नमूद केले आहे. म्हणून अथर्ववेदाला "भृग्वंगिरसवेद''असेही म्हणतात.

ऋग्वेदाच्या नवव्या मंडलातील ६५ वे सूक्त भृगू व जमदग्नी यांचे, तर दहाव्या मंडलातील १९ वे सूक्त भृगू, मथित व च्यवन यांचे आहे.

**यः उत् आनट् वि-अयनं**
**यः उत् आनट् परा-अयनं ।**

**आवर्तन निवर्तन**
**अपि गोपाः नि वर्ततां**
**।ऋ.मं.१०.५**

जो गोपालक सगळ्या गाईंना शोधून परत आणतो, गाईंच्या बरोबर रोज सगळीकडे फिरून गोपालनाचा अनुभव मिळवितो. जो गाईंना परत गोशाळेत आणतो व दुसऱ्या दिवशी सकाळी चरावयास नेतो, तो गोपालक रोज सुखरूप परत येवो, असा वरील वेदमंत्राचा सरलार्थ वाटत असला तरी त्यातला या भृगुच्यवनादी मंत्रद्रष्ट्यांना अभिप्रेत असलेला भावार्थ फार सुंदर आहे. 'गो' या शब्दाचा अर्थ जसा गायी तसाच त्याचा दुसरा अर्थ इंद्रिये हाही होय. जो योगी विषयभोगांमध्ये रममाण झालेल्या आपल्या सर्व इंद्रियांना भोगांपासून परावृत्त करून अंतर्मुख होतो, आत्मचिंतन करतो, परत आपली प्राप्त कर्तव्ये करण्यासाठी त्या इंद्रियांना कामाला लावतो, कर्मयोगाने कर्म करूनही निरहंकारी, निर्मम होतो आणि परत सर्व इंद्रिये बाह्य विषयांकडून परतवून आत्मध्यानात मग्न होतो, अशा गोपालकाचे कार्य सुरळीत चालो. अशारीतीने या सूक्तात कर्मयोग व ध्यानयोग यांचा सुरेख समन्वय साधला आहे.भृगू हे अंगिरसाप्रमाणे आथर्वण धर्माचे प्रणेते आहेत. वेदांच्या रचनेला भृगुकुलातील पुरुषांनी बराच हातभार लावला आहे. भृगूंच्या नावावर भृगुस्मृती, भृगुगीता, भृगुसंहिता, भृगुसूत्र आहे. त्यांनी वास्तुशास्त्रावरही ग्रंथ लिहिला आहे.

(पूर्वार्ध)

# मंत्र वारीचा



**मंत्र वारीचा संतांच्या पायधूळीतून**
**भिजतो मातीचा जीव...**
**शब्दांच्या ओवाळणीतून गुंफतो**
**भावाचा पीस।**
**पंढरीच्या वाटेवरती घामाचे मोती**
**चमकती...**
**नामाच्या गजरात उरते भक्तीची**
**अमोल रत्ने।**
**वाऱ्याच्या तालावरती फडकते**
**झेंडा साक्षीला...**
**तुकोबाच्या ओवीतून मुक्तीचा**
**अर्थ उमलतो।**

बाहेर भुरभुरणारा पाऊस मनात कुठेतरी हुरहूर माजवत होता म्हणूनच असेल कदाचित वारीची ओढ लागलेल्या माझ्या लेखणीतून हे शब्द उमटले. खरोखरच भक्ताचे भाव पावसाच्या सरींसारखे बरसतात तिथे जिथे तेथे आनंद आहे, वेदना आहे आणि विठ्ठल भेटीचा अनंत सोहळा आहे अशा त्या वारीची ओढ मनाला लागली तर नवल ते काय? कस आहे ना की समर्पणाचा अंतिम क्षण पंढरीच्या वारीत आपले देहभान हरवते. तेथे केवळ भक्ती आणि आत्मशोध उरतो आणि उरते ती अव्यक्त वेदना आणि निर्मळ समाधान आहे. वेदनेची शाश्वत लहर आहे ती किंवा सहजतेचा नितळ प्रवाह म्हणा हवतर. वारी म्हणजे नक्की काय? तर वारी म्हणजे अखंड प्रवास, अखंड भक्ती आणि अखंड प्रेम की जे असते विश्वाच्या अस्तित्वाच्या उत्सवावर, वारी असते सतत वाहणाऱ्या भक्तिरसाचा शाश्वत सोहळा अखंड अविरत सुदाम्याच्या पोह्यांसारखा आयुष्यभर पुरणारा. वारी असते ती गोंदण वाट की जी आत्म्याची ओढ देहाच्या साजावर विसंबून, भक्ताच्या अंतःकरणात उमटणारी विठ्ठल भेटीची आस. वारी असते आत्मशोधाची अशी वारकऱ्यांचा देह चालतो, पण ओढ आत उरते ती केवळ विठ्ठल भेटीची. वारकऱ्याचे पाऊले भक्तिरसात नाहून निघते. ती वाऱ्यावर हलती ओढ अंतरीचा तो साज, विसरतो देहभान. विठ्ठल नामाच्या सुरात ओठ अलवार होतात आणि धुक्यात हरवते वारी मग आभाळ ही भरून येते आणि भिजलेल्या मनाने भक्ती रस्तोरस्ती सांडते. अगदी खरं सांगायचं, तर वारी ही केवळ चाल नाही, ती अंतःकरणाची भाषा आहे.

विठ्ठल नामाच्या संगतीच्या आर्त जपात, हरवत चालणारा ती भक्ती ओढ, समर्पण आणि अनंत शरणागत या वाटेवर मिळणारा शुद्धतेचा साक्षात्कार असतो. वारी असतो एका प्रवासाचा मंत्र किंवा उषःकालच्या धूसर प्रकाशात पंढरीच्या दिशेने वाहणारा ओघ. हे चालणारे पाय केवळ पंढरीच्या वाटेवरून जात नाहीत, तर आपल्या मनाच्या गाभ्यातील अंधाऱ्या कोपऱ्यांमध्येही उजेडाचा साक्षात्कार घडवतात. धुळकट रस्त्यावर उमटणाऱ्या पाऊलखुणा म्हणजे श्रद्धेचा ठसा असतो. प्रत्येक पाऊल पुढे पडते ते एका वेगळ्या विश्वाच्या शोधात पडत. ओव्यांनी भारलेला हा प्रवास थकवा विसरायला लावतो आणि अंतरी भाव दाटतो तो विठुरायाच्या भेटीच्या आर्ततेचा आणि मग शब्दांच्या मागे धावणारे मन एका अनाम प्रेमाच्या झंझावातात गुंतून जाते.



**ऋतुराज**
**ऋतुजा केळकर**

त्या निळ्या आकाशाखाली वारकऱ्यांच्या टाळ मृदुंगाच्या ठेक्यात कधीतरी कराल काळही हरवतो. आवाजांची लय, चालण्याचा ताल आणि ह्रदयाच्या स्पंदनांची एकसंध लहर, हीच खरी मुक्ती आहे याची पदोपदी जाणीव होते.

हा प्रवास आहे अंतःकरणाचा, जिथे जन्म मृत्युच्या सीमा देखील लोप पावतात आणि उरतो तो फक्त विठू नामाचा गजर.वारी म्हणजे केवळ चालणारा प्रवास नव्हे, तर आत्म्याचे शुद्धीकरण आणि ब्रह्मतत्त्वाच्या अनुभूतीचा मार्ग आहे. संत ज्ञानेश्वरांनी या वाटेवर अद्वैताची अनुभूती दिली, जिथे देहाचे अस्तित्व विसरून आत्मा विश्वात विलीन होतो.धिटुकली मुक्ताई भक्तीचा स्वर स्वच्छंदतेने गोंधळत मुक्ततेचा मंत्र जपून गेली तर अशा या भावंडांचा वारकरी समुदायाशी असलेला नातेसंबंध हा केवळ श्रद्धेचा नव्हता, तर अंतःकरणाच्या विलीनतेचा होता. जनाबाईंनी तर नामस्मरणाला कर्मयोगाचा स्पर्श दिला. त्यांच्या सेवेतील प्रत्येक स्पंदन हे ईश्वराशी संवाद होता, जिथे अहंकार लोप पावतो आणि भक्ती आत्म्याच्या स्वरूपात प्रकटते. तर तुकाराम महाराजांनी नामाचा गजर म्हणजे निर्भयतेचा ध्वजच उभारला. त्यांच्या ओव्यांमध्ये आत्मशुद्धीचा साक्षात्कार घडतो आणि वारी ही केवळ पंढरीची वाटच राहत नाही, तर अनादी परमात्म्याचा शोध देखील बनते. आता पहा ना पुंडलिकाच्या कृतीमधून एक नवा सत्याचा प्रकाश पडतो आणि सेवा म्हणजेच भक्ती आणि भक्ती म्हणजेच ईश्वराचा साक्षात्कार हा त्यांच्या विनयातून गवसतो, मग समर्पणाचे परम तत्त्व देखील त्यातूनच जाताच्या समोर येते कारण जिथे परमात्म्याचा स्वीकार मनापासून केलेला असतो.

वारी ही चालणाऱ्या पावलांची नव्हे, तर मनाच्या निवेदनाची वाट आहे. ही वाट श्रद्धेच्या दीपातून उजळते आणि भक्तीच्या लयीत विलीन होते. यात माणूस केवळ देह नसतो, तर एक सजीव मंत्र बनतो जो संतांच्या ओवीतून अनंतात विलीन होतो. म्हणूनच तर वारी म्हणजे केवळ चालणं नव्हे, तर जीवनाच्या प्रत्येक कडवट अनुभवाला गोड करण्याचा एक मार्ग. हे नुसते मूक पायपीट करणारे शरीर नव्हे, तर विचारांच्या गूढतेत हरवलेली माणसं. आणि पंढरीच्या वाटेवरील प्रत्येक पाऊल हा एक आत्मशोध, ज्यात संपूर्ण सृष्टीचा स्पर्श जाणवतो. अखेरीस इतकच म्हणेन की,

धुळीच्या कानांनी ऐकला मंत्र...
पावलांच्या ठेक्यात मिळवला अंतर...
हृदयाच्या स्पंदनांत जागले गूज...
संतवाणीच्या सूरांत गवसला ईश...

# स्वामी विवेकानंद : एक थोर युगपुरुष



ज्यांच्या विचारांनी सतत नवी ऊर्जा मिळते असे युवकांचे प्रेरणास्थान व आपल्या भारतीय तत्वज्ञानाचा ठसा उमटवणारे एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वामी विवेकानंद!

अंधश्रद्धाळूंचा देश, गुलामांचा देश म्हणून भारताला हिणवले जात असे. स्वामी विवेकानंद हे सांगतात, ''भारतीय बंधूनां परस्पराचे गुणग्रहण करावयास शिकविणारी, परस्परांना साहाय करावयास शिकविणारी संघटना फार आवश्यक आहे. माझ्या अमेरीकेतील कार्याविषयी आनंद व्यक्त करण्यासाठी कलकत्त्यात योजलेल्या सभेत पाच हजार लोक आले होते. अन्य गावी शेकडोची उपस्थिती होती. हे ठिकच आहे. पण आपल्या माणसांपैकी प्रत्येकाला ''तु एक आणा दे'' असे म्हटले असते तर किर्तीनी तो दिला असता? आमच्या सर्व देशाला दुसऱ्यावर अवलंबून राहायची सवय आहे. घास त्यांच्या तोंडापर्यंत आणूल दिला तर ते आनंदाने खातील. पण काही जण असेही म्हणतील की,'आम्हाला भरवा हो'! तुम्ही आत्मनिर्भर होऊ शकत नसलात तर तुम्ही ह्या जगात जगण्यास नालायक आहात.'' स्वामीजी भारतीयांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालीत आहे. देशाला स्वामी विवेकानंदांच्या मनुष्य निर्माण विचारांची आजच्या परिस्थितीत भारताला आत्मनिर्भर करण्यासाठी आवश्यक आहे.

आपल्या भारतवर्षावर जेव्हा परकीयांची एकामागोमाग अनेक आक्रमणे झालीत आणि तेव्हा भारतीयांचा पराक्रम लोप पावला, आपआपसात वैमनस्य वाढले. चांगल्या वाईटांचा विवेकही नाहिसा झाला आणि सगळ्या गुणांची माती झाली. आम्ही गुलाम आहोत, आम्ही दुर्बल आहोत, आम्ही फक्त सेवेचे अधिकारी, राज्य करावे तर परकीयांनीचं! असा भाव सगळीकडे उत्पन्न झाला. याचा परिणाम असा झाला की, परकीयांनी आपल्या देशात शेकडो वर्षे राज्य केले. भारताच्या उन्नतीचा मार्ग हरवून बसलो. भारताच्या स्वातंत्र्यानंतर ही पाश्चात्य विचारांच्या गुलामीचे मानसिकतेचे भूत मात्र तसेच बसून राहिले. परकीय इंग्रज भारताच्या समोरच्या दरवाज्यातून गेले आणि मागच्या दरवाज्यातून विदेशी कंपन्यांची भरमार देशात होवू लागली त्याला कारणीभूत होती ती आपली इंग्रजाळलेली परकीय गुलामीची मानसिकता. ही गुलामीची मानसिकता भारतीयांनी झुगारून टाकावी यासाठी महान तत्ववेत्ता स्वामी विवेकानंद यांनी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले होते.



**आत्मज्ञान**
**प्राची परचुरे वैद्य**

भारतीयांना जागृत करताना स्वामीजी म्हणतात, ''भारतीयांनो, मोहमायेतून जागे व्हा! ते कसे व्हायचे याचा मार्ग आपल्या अध्यात्मिक ग्रंथामध्ये आहे. आपल्या मूळ स्वरूपाचे ज्ञान करून घ्या. आपल्यातल्या सुप्त शक्तीला आवाहन करा. ही सुप्त आत्मशक्ती जागृत कार्यशक्तीच्या रूपाने प्रकट झाली म्हणजे प्राप्त होणार नाही असे काय आहे? सामर्थ्य येईल, वैभव येईल, सदगुण येईल, शुचिता येईल! जे उदात्त, उत्तम, उन्नत आहे.'' स्वामी विवेकानंदांनी आत्मनिर्भर भारत निर्माण होण्यावर खूप भर दिला.

सन १८५७ च्या स्वातंत्र समरानंतर सर्वांत महत्त्वाची घटना घडली असेल तर ती म्हणजे ११ सप्टेंबर १८९३ रोजी शिकागो येथे धर्मसभेला केलेले उद्‌बोधन. समस्त भारतीय जीवन दर्शन, संस्कृती आणि सभ्यता हे त्यांनी आपल्या ओजस्वी वाणीने मांडले. त्यामुळे भारताकडे पाहण्याचा जगाचा दृष्टिकोन बदलला.

स्वामीजी म्हणत असत की, धर्म हेच आपल्या जीवनाचे तत्व आहे. हिंदुस्थानाचा प्राण आहे. गुलामीच्या काळातही आम्ही आपला धर्म आणि संस्कृती यांची कास धरली. संत, सत्पुरुषांनी भारतीय विचारांना तेजोमय ठेवण्याचे महान कार्य केले आहे. राष्ट्रावरील नितांत प्रेम यांमुळेच स्वामीजींनी या सर्व गोष्टी सांगितल्या आहेत. म्हणूनच आपण त्यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवला पाहिजे. स्वामींचा स्पष्ट इशारा आहे की, आपण धर्माची उपेक्षा करू, तर तीन पिढ्यांतच नष्ट होवून जाऊ. म्हणूनच राष्ट्र जीवनात कार्य करताना अध्यात्मिक अधिष्ठानावरच राष्ट्राचे पुनरूज्जीवन करावे लागेल. आपल्या दैनंदिन व्यावहारिक जीवनात आपण स्वामीजींच्या उपदेशानुसार समाज जीवनात आचरणात आणू या. आपल्याला वैभवशाली जागृत भारत निर्माण करायचा आहे. प्रत्येक भारतीयांच्या मनात माझा भारत ही भावनेचे जागरण करण्याची आवश्यकता आहे. या विधायक कार्यासाठी समस्त युवकांनी झोकून दिले पाहिजे. ठरवलेले उद्दिष्ट साध्य होईपर्यंत न थांबता सतत काम करत राहणे हा त्यांचा विचार कायम आत्मसात करायला हवा.

# शरीर साक्षात परमेश्वर

अनंत कोटी ब्रह्मांड, अनंत रूपे अनंत वेषे अशी परमेश्वराची रूपे आहेत. अनंत कोटी ब्रह्मांड म्हणजे मोजताही येणार नाही इतकी अगणित ब्रह्मांड आहेत. आपल्या सूर्यासारखे अनंत सूर्य आहेत असे आता शास्त्रज्ञ सांगत आहेत. आपल्याला एकच सूर्य माहीत आहे. अनेक ग्रह आहेत. अनेक उपग्रह आहेत. हे सगळे ज्याने निर्माण केले, जिथून निर्माण झाले तो परमेश्वर. त्याने असे कधी म्हटले आहे का की हे मी निर्माण केले. हे सगळे ऐश्वर्य माझे आहे असा अहंकार त्याने कधी केला आहे का ? हे सगळे ऐश्वर्य, हा निसर्ग हे सर्व काही माझे आहे असा अहंकार तो कधी करत नाही. त्याच्या ठिकाणी इतके ज्ञान आहे, इतके दिव्य ज्ञान आहे पण मी ज्ञानी आहे असे कधी तो म्हणत नाही. नाहीतर आपल्याकडे नुसता पदवीधर झाले तरी मी कुणीतरी मोठा असे समजायला लागतो. अरे पण त्या परमेश्वराच्या ठिकाणी ज्ञान, दिव्य ज्ञान इतके आहे की आपल्याला त्याची कल्पनाही करता येणार नाही. जसे त्याचे बाकी सर्वच अनंत आहे तसे त्याच्या ठिकाणी असलेले ज्ञानही अनंत आहे. एवढे ज्ञान त्याच्या ठिकाणी असूनसुद्धा त्याला त्याचा अहंकार नाही. तुम्ही म्हणाल त्याच्या ठिकाणी ज्ञान आहे हे कशावरून ? जगांत सर्व ठिकाणी व्यवस्था आहे यावरून. जगांत जी सर्व ठिकाणी व्यवस्था आहे ती जरी पाहिली तरी त्याच्या ठिकाणी असलेल्या ज्ञानाची, दिव्य ज्ञानाची तुम्हाला कल्पना येईल. आपल्या शरीराकडे जरी पाहिले तरी आपल्याला त्याची कल्पना येईल. आपण आपल्या शरीराकडे जसे कौतुकाने पाहायला हवे तसे पाहत नाही. आपल्या शरीरात जी व्यवस्था आहे ती पहिली तरी डोळे, नाक, कां, एकेक अवयव म्हणजे सुंदर अशी व्यवस्था आहे. दात तोंडात उमलतात कसे ? जशी एखादी कळी उमलावी तसे हे दात तोंडात उमलतात. जीभ, पडजीभ, हिरड्या हे सर्व येतात कुठून ? कळी उमलावी तसे हे तोंडात सर्व उमलत जाते. तिथे काहीही अव्यवस्था नाही. सगळी सुंदर अशी व्यवस्था आहे. आपल्या शरीराकडे जरी पहिले तरी आपले शरीर ही दिव्य व्यवस्था आहे म्हणून मी शरीर साक्षात परमेश्वर असा सिद्धांत मांडला. शरीराचे बाह्यांग इतके दिव्य आहे. अंतरंग सोडाच, बाह्यांगच इतके दिव्य आहे. आत गेलात तर ते हृदय, यकृत, फुफुसे , किडनी, ते रक्त कसे निर्माण होते ? रक्ताचा पुरवठा कसा होतो ? यांत किती व्यवस्था आहे हे पाहिले तर हे सर्व दिव्य आहे. हे कुणीही मी निर्माण केले असे म्हणू शकत नाही. रक्त मी निर्माण केले असे आपण म्हणू शकतो का ? रक्ताचे अभिसरण मी करतो असे आपण म्हणू शकत नाही. कारण हे सर्व आपोआप चाललेले आहे.



**जीवन संगीत**
**सद्‌गुरू वामनराव पै**



## वेचक

### विद्यार्थी गुणगौरव समारंभ उत्साहात




**पिंपरी :** आरंभ सोशल फाऊंडेशन आयोजित विद्यार्थी गुणगौरव समारंभ व करिअर मार्गदर्शन शिबीर समारंभ नुकताच आचार्य अत्रे रंगमंदिर, संत तुकाराम नगर, पिंपरी येथे उत्साहात पार पडला. पिंपरी-चिंचवड शहरातील चारशेहून अधिक दहावी, बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. शहराचे माजी उपमहापौर तुषार हिंगे, आरंभ फाऊंडेशनच्या संचालिका सोनाली तुषार हिंगे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. टॅब, स्मार्ट वॉच, बॅग आणि प्रशस्तिपत्रक असे बक्षिसांचे स्वरूप होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून युवा पत्रकार व मित्र सौमित्र पोटे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सौमित्र पोटे यांनी अगदी सहज सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या आयुष्यातील अनुभव सांगत उपस्थित विद्यार्थ्यांना मैत्रीचा सल्ला दिला की, आपल्याला जे आवडेल तेच करा. गुण कमी जास्त झाले तरी नाउमेद होऊ नका.

### माऊलींना एक कोटी रुपये किमतीचा सुवर्ण मुकुट अर्पण

**पुणे :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थानापूर्वी नांदेड येथील भारत रामिनवार आणि मीरा रामिनवार यांनी मंगळवारी आळंदी येथे माउलींना एक कोटी रुपये किमतीचा एक किलो सोन्यापासून बनविलेला मुकुट अर्पण केला. पु. ना. गाडगीळ आणि सन्स लि. यांनी चार महिन्यांच्या अथक परिश्रमातून हा मुकुट साकारला आहे. पारंपरिक नक्षीकाम, धार्मिक प्रतीकांची सूक्ष्म कोरीव रचना आणि आधुनिक थ्रीडी तंत्रज्ञानाचा समन्वय या मुकुटाच्या घडणीमध्ये पाहायला मिळतो. मुकुटावर कमळ, चक्र, सूर्यकिरण या धार्मिक प्रतीकांची कलात्मक मांडणी करण्यात आली आहे. वारकरी परंपरेशी नाते असलेल्या कारागिरांनी हा मुकुट घडवला आहे. आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे, ॲड. राजेंद्र उमाप आणि व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांच्या उपस्थितीत माउलींना हा अलंकार भक्तिपूर्वक अर्पण करण्यात आला.

### नरेंद्र मोदी सरकारमधील एकाही मंत्र्यावर भ्रष्टाचाराचा आरोप नाही : प्रकाश जावडेकर

**पुणे :** 'केंद्र सरकारने संरक्षण उत्पादनांच्या देशाअंतर्गत उत्पादनाला चालना दिली. त्यामुळे भारत आता शस्त्रास्त्रांची निर्यात करणारा देश बनला आहे. ऑपरेशन सिंदूरमधून भारताच्या सामर्थ्याचे दर्शन जगाला घडले. काँग्रेसच्या काळात शस्त्रास्त्र खरेदीत दलालांचा सुळसुळाट होता; पण संरक्षण खरेदीतील 'दलाल' बाहेर काढून सरकार थेट संबंधित देशांशीच करार करत आहेत, असे मत माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी व्यक्त केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अकरा वर्षांच्या काळात विरोधी पक्ष केंद्र सरकारमधील एकाही मंत्र्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करू शकले नाहीत, एकाही मंत्र्याला राजीनामा द्यावा लागला नाही,' असेही त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारला ११ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे जावडेकर यांच्या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. शहराध्यक्ष धीरज घाटे, संदीप खर्डेकर, सरचिटणीस रवींद्र साळेगावकर, पुनीत जोशी, अमोल कविटकर, हेमंत लेले आदी उपस्थित होते.

### आळंदीमध्ये कुलदेवी मंदिराच्या प्रतिकृतीचे अनावरण

**आळंदी :** महाराजा अग्रसेन किचन ट्रस्टच्या वतीने अग्रोहा तीर्थ, श्री क्षेत्र आळंदी, चऱ्होली येथे उभारण्यात येत असलेल्या कुलदेवी मंदिराच्या प्रतिकृतीचे अनावरण अत्यंत भक्तिमय वातावरणात व उत्साह पार पडले. हे अनावरण सामाजिक कार्यकर्ते रोहतास बंसल (हांडेवाडी) आणि राधेश्याम अग्रवाल (विश्रांतवाडी) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुणे जिल्ह्यातील अग्रवाल समाजातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. ट्रस्टचे अध्यक्ष सीए कृष्णलाल बंसल यावेळी म्हणाले की, महाराजा अग्रसेन किचन ट्रस्ट ऑक्टोबर २०१८ पासून सामाजिक, धार्मिक अशा क्षेत्रात कार्यरत आहे. ट्रस्टचा एक महत्वाचा उपक्रम म्हणजे पुणे व पिंपरी-चिंचवड येथील ७ रुग्णालयांमध्ये दररोज गरजू रुग्णांना मोफत जेवण पुरवण्याची सेवा, जी २०१८ पासून अविरतपणे सुरू आहे. 'अग्रोहा तीर्थ' या प्रकल्पाशी अधिकाधिक अग्रवाल कुटुंबांनी जोडावे, असे आवाहन केले गेले आहे. हे तीर्थस्थान संत ज्ञानेश्वरांच्या समाधीपासून केवळ ३ कि.मी. अंतरावर आहे.

# 'संतपीठात शिक्षण घेणारे विद्यार्थी भागवत धर्म जगभरात पोहोचवतील'

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला विश्वास

◆ **पिंपरी (प्रतिनिधी) :**

आपली संस्कृती, संतांचे विचार, परंपरा जगापर्यंत पोहोचविण्यासाठी आधी ते पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ येथे शिक्षण, प्रशिक्षण देण्यात येणार असून येथे शिकणारा विद्यार्थी भागवत धर्म जगभरात पोहोचवेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.





श्रीक्षेत्र टाळगाव, चिखली येथे वारकरी संप्रदायासोबत अत्याधुनिक शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था विकसित केलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या कलादालन व सभागृहाच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, अमित गोरखे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, संतपीठाचे संचालक डॉ. सदानंद मोरे, चिंतन समिती, संतपीठ समितीचे पदाधिकारी तसेच पालक प्रतिनिधी व विद्यार्थी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राला मोठी संतपरंपरा लाभलेली आहे. संतपरंपरा जपण्याचे काम संतपीठात होणार आहे. या ठिकाणाला वैश्विक स्वरुप देण्याचे काम करण्यात आले असून येथे संपूर्ण संतसाहित्य सीबीएसई अभ्यासक्रमाच्या माध्यमातून संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी या चारही भाषांमधून शिकविले जाणार आहे. विविध वाद्य वाजविण्याचे प्रशिक्षणही या ठिकाणी देण्यात येणार आहे. ते म्हणाले, संतपीठाने तयार केलेल्या यापुढील संकल्प आराखड्यानुसार पंढरपूर व आळंदी येथे उभारण्यात येणाऱ्या संतपीठाला महाराष्ट्र शासन पूर्णपणे मदत करेल. सगळ्या ठिकाणचे संतपीठ एकमेकांना पूरक बनविण्यात येतील. नवीन शैक्षणिक धोरणामुळे मराठी भाषेला ज्ञानभाषा बनविण्याचा मार्ग खुला केला असून मराठीला वैश्विक भाषा, ज्ञानभाषा व अर्थकारणाची भाषा बनविण्याचे दालन खुले केले आहे. हे धोरण महाराष्ट्र शासनाने स्वीकारले असून सर्व शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्यात आली आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. इतर भारतीय भाषेचा तिरस्कार करणे योग्य नाही, असेही ते म्हणाले.

तत्पूर्वी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते पुणे आळंदी पालखी मार्गावर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने उभारलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज व संत नामदेव महाराज यांच्या भेटीचे समूहशिल्प आणि संतसृष्टीचे लोकार्पण करण्यात आले. या संतसृष्टीत विविध संतांच्या जीवनावर आधारित विविध भित्तीचित्रे बसविण्यात आली आहेत. संत नामदेव महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत सोपान महाराज, संत निवृत्ती महाराज, संत मुक्ताबाई व इतर वारकरी २० असे एकूण २५ शिल्पे मिश्र धातूमध्ये बनविण्यात आली आहे. सदर जागेत विविध संतांच्या जीवनातील प्रसंगांवर आधारित एकुण ४७ कांस्य धातुच्या शिल्पांचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. या कामावर ३० कोटी ६९ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे.

### पालखी मार्गावर ३६ आरोग्य पथके

**पुणे :** पुण्यात शुक्रवारी (दि. २०) संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे पुण्यात आगमन होत आहे. प्रशासक तथा महापालिका आयुक्त नवल किशोर राम पालखींचे दर्शन घेऊन शहरात स्वागत करणार आहेत. पालखी सोहळ्यासाठी महापालिकेच्या विविध विभागांच्या वतीने वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी विविध सोयिसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याअंतर्गत शहरात दोन्ही पालखी मार्गांवर ३६ ठिकाणी आरोग्य पथके उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली. शहरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाळामुळे अनेक ठिकाणी चिखल झाला आहे. त्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन शहरात औषध फवारणी करण्यात आली आहे. तर दोन्ही पालखी मार्गावर ३६ ठिकाणी आरोग्य पथके उपलब्ध करून दिली आहेत. पालखी आगमन काळात शहरातील सर्व पालिकेचे दवाखाने ओपीडी, सर्व मॅटरनिटी होममध्ये मोफत विनामूल्य सुविधा उपलब्ध असतील.

### पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांचे आदेश

# धोकादायक पर्यटन स्थळे तात्पुरती बंद ठेवा





◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

कुंडमळा घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी धोकादायक पर्यटनस्थळी जाण्यास बंदी घालावी आणि पर्यटनस्थळाच्या रस्त्यावर दिशादर्शक फलके लावावेत असे आदेश दिले आहेत. त्यासाठी जिल्ह्यातील धोकादायक ठिकाणांची पाहणी करुन स्थळांची निश्चिती करावी. नागरिकांमध्ये जनजागृती करावी. पावसाळ्यात धोकादायक नसलेल्या तथापि पाणी साचणाऱ्या रस्त्यावर बॅरिकेट करावे, असेही आदेश दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या कामकाजाचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक ग्रामीण संदीप गिल्ल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी डुडी म्हणाले की, मावळ तालुक्यातील कुंडमळा येथे घडलेली दुर्घटना आणि त्यात झालेले ४ पर्यटकांचे मृत्यू हे दुर्दैवी आहेत. नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देऊन संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे काम करावे. आपत्ती काळात जिल्हा प्रशासनाच्यावतीने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. धोकादायक ठिकाणी मॉकड्रील आयोजित करावे. तालुकास्तरीय नियंत्रण कक्ष २४ तास सुरु ठेवावेत. गर्दीच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त व जीवरक्षक पथकाची नियुक्ती करावी. महावितरणने वीजेचे खांब, रोहित्र, तारांची तपासणी करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

**सात दिवसांत स्ट्रक्चरल ऑडिट**

आपत्ती व्यवस्थापनाच्यादृष्टीने जिल्ह्यातील धोकादायक तसेच अतिधोकादायक जुने पुल, साकव, रस्ते, इमारती, वाडे, जाहिरात फलके, रेल्वे पुलांचे येत्या ७ दिवसांत स्ट्रक्चरल ऑडिट करुन त्याचा अहवाल जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे सादर करावा, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. धोकादायक पूल, साकव, इमारती, वाडे, जाहिरात फलके काढून घ्यावेत. कार्यवाही करतांना नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घ्या, असेही त्यांनी सांगितले.

### श्री संत तुकाराम महाराज मंदिरात उपमुख्यमंत्री अजित पवारांनी घेतले दर्शन

◆ **पिंपरी (प्रतिनिधी) :**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थान श्री क्षेत्र देहू येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर आणि श्री संत तुकाराम महाराज शिळा मंदिर आणि श्रीराम मंदिरात दर्शन घेतले. यावेळी आमदार सुनील शेळके, श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. जालिंदर मोरे, पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प. गणेश महाराज मोरे, ह.भ.प वैभव महाराज मोरे, ह.भ.प दिलीप महाराज मोरे, विश्वस्त ह.भ.प. विक्रमसिंह मोरे, ह.भ.प.उमेश महाराज मोरे, ह.भ.प. लक्ष्मण महाराज मोरे आदी उपस्थित होते. दर्शनानंतर संस्थानच्या वतीने पवार यांचा सत्कार करण्यात आला. टाळ-मृदुंगाच्या तालावर भक्तिरसात चिंब झालेले वारकरी, 'ज्ञानोबा माऊली', 'माऊली, माऊली' चा गजर, डोक्यावर तुळशी वृंदावन, हाती दिंड्या-पताका घेतलेले वारकरी अशा भक्तिमय वातावरणात जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले.



# राज्यात गोवंश जतन दिन साजरा करण्यास मान्यता

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

राज्यात देशी गायींच्या संख्येत घट होण्याची कारणमिंमासा विचारात घेऊन देशी गायींच्या संख्येत वाढ करण्याबरोबरच त्यांची उत्पादनक्षमता व प्रजननक्षमता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे, त्याच बरोबर देशी गायींच्या संवर्धनाचे महत्त्व तसेच पशुजन्य उत्पादनाचे महत्त्व ग्राहकांना पटवून देऊन देशी गाय पशुपालकांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या बाबी विचारातघेऊन राज्यात दरवर्षी २२ जुलै रोजी 'शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धनदिन' साजरा करण्यास शासनाने मान्यता दिली आहे, अशी माहिती महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली.



देशी गायीच्या दुधाची उपयुक्तता तसेच शेण आणि गोमुत्र यांचे महत्त्व विचारात घेऊन गायीस कामधेनू असे संबोधण्यात येते. देशी गायींच्या संवर्धनास प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने देशी गायीस 'राज्यमाता-गोमाता' म्हणून घोषित केले आहे. अनेक गोरक्षण संस्था, कृषी विद्यापीठे, व गोसेवा केंद्रे २२ जुलैला देशी गायींच्या महत्त्वाबद्दल जनजागृती करण्यासाठी कार्यक्रम घेतात. हा दिवस देशी गायींच्या संवर्धनासाठी, त्यांच्या दुग्ध उत्पादकतेच्या प्रचारासाठी आणि भारतीय गोवंशाच्या वैज्ञानिक व सांस्कृतिक महत्त्वावर प्रकाश टाकण्यासाठी पाळला जातो.

शेखर मुंदडा म्हणाले, 'शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन' हा केवळ एक दिवस साजरा करायचा नसून, तो देशी गायींच्या रक्षणासाठी दीर्घकालीन जन चळवळ होणे आवश्यक आहे. दिनांक २२ जुलै हा दिवस त्या दिशेने एक पाऊल ठरू शकतो. यानिमित्त महाराष्ट्र गोसेवा आयोगाने राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत कार्यवाही सुरु केली आहे. अनेक गावांमध्ये २२ जुलैच्या आसपास 'गोपालन सप्ताह' किंवा 'गोपूजन' यांसारखे कार्यक्रम होतात. पावसाळ्याच्या सुरुवातीला, गायींचे आरोग्य, पोषण आणि संगोपन याबाबत विशेष लक्ष दिले जाते. त्यामुळे आता २२ जुलै हा दिवस 'शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. हा दिवस साजरा करताना देशी गाय व गायीपासून मिळणाऱ्या उत्पादनांचे महत्व व आवश्यकता विशद करणारी विविध चर्चासत्रे, प्रदर्शने, शिबीरे, स्पर्धाचे आयोजन आयुक्त पशुसंवर्धन व महाराष्ट्र गोसेवा आयोग यांनी संयुक्तरित्या करावे व यासाठी येणारा खर्च महाराष्ट्र गोसेवा आयोगाने उपलब्ध निधीतून भागवावा, असे शासनाने निर्देशित केले आहे.

### पिंपरी-चिंचवडचे नाव 'जिजाऊ नगर' करा

◆ **पिंपरी ( प्रतिनिधी):**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका एक औद्योगिक नगरी म्हणून ओळखली जाते; परंतु या शहराला, या भूमीला मा जिजाऊ यांच्या संस्काराची, अस्मितेची चिरंतन असणारी एक ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. छत्रपती शिवराय यांच्यामध्ये स्वराज्याचे स्फुल्लिंग जिजाऊ यांनी जागविले. जिजाऊंना म्हणजेच मातृशक्तीला मानाचा मुजरा करून पिंपरी-चिंचवड शहराचे नाव "जिजाऊ नगर" करावे अशी मागणी भक्ती शक्ती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश हिरामण बारणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंगळवारी (दि. १७) मंत्रालय, मुंबई येथे प्रत्यक्ष भेटून पत्राद्वारे केली आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांना बारणे यांनी जिजाऊ आणि छत्रपती शिवराय व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे शिल्प असणारी प्रतिकृती भेट दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या पत्रात महेश बारणे यांनी म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहराचे नाव "जिजाऊ नगर" करण्यात यावे ही केवळ नामांतरणाची मागणी नाही. हा महाराष्ट्राच्या मातृशक्तीला मानाचा मुजरा आहे. ही मा जिजाऊ यांची स्मृती, अभिमानाची साक्ष आहे. जिजाऊंच्या स्वाभिमानी विचारांपुढे नतमस्तक होऊन त्यांचा गौरव होण्याची हीच योग्य वेळ आहे अशी या भूमीतल्या सर्वांची सार्वत्रिक भावना आहे. आपण आपला जाज्वल्य भूतकाळ आपण का विसरायचा? ज्या मायेनं 'शिवबा' घडवले, तिच्या नावाने हे शहर घडवायला आपण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून लवकरात लवकर निर्णय घ्यावा. साडेतीनशे वर्षांच्या या इतिहासात माँसाहेब जिजाऊंनी दिलेला वारसा आजही आपल्या धमन्यांतून वाहतोय. पण आपण त्यांच्या नावाचा, त्यांच्या त्यागाचा, त्यांच्या मायेच्या सामर्थ्याचा सन्मान केला पाहिजे. भक्ती शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने आणि सर्व शहरवासीयाचे वतीने आपणांस नम्र विनंती करीत आहोत की पिंपरी-चिंचवड हे नाव बदलून 'जिजाऊ नगर' असे नाव करावे.

# 'आईचा पदर आता पूर्वीसारखा राहिला नाही'

'विज्ञान आणि आधुनिकतेच्या अति आहारी गेल्यामुळे तसेच विवाहसंस्था संकटात सापडल्यामुळे भौतिकतेच्याही पलीकडचा असलेला आईचा पदर आता पूर्वीसारखा राहिला नाही; तसेच आधुनिक समाजात जीन्स आणि टॉपच्या फॅशनमुळे, ताण तणावामुळे आईच्या पदराचे दर्शन दुर्लभ होत चालले असून पदराचा आदरही कमी होत आहे!' अशी खंत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि साहित्यिक डॉ. लक्ष्मण शिवणेकर यांनी अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी येथे आयोजित कार्यक्रमात व्यक्त केली. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी आणि राष्ट्रीय लोक अदालतीतील न्यायाधीश ॲड. रमेश उंबरगे लिखित 'आईच्या मायेचा स्पर्श' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना डॉ. लक्ष्मण शिवणेकर बोलत होते. सेवानिवृत्त साहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब आंदळकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तसेच कवी रमेश उंबरगे याचे कुटुंबीय, मित्र परिवार आणि विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर व्यासपीठावर व सभागृहात उपस्थित होते.



डॉ. लक्ष्मण शिवणेकर पुढे म्हणाले की, 'वास्तविक आई हा विषय प्रत्येकाच्याच जिव्हाळ्याचा असल्यामुळे आई या विषयावर हजारो कविता लिहिल्या गेल्या आहेत. हा विषय कधीही शिळा होणारा नाही. म्हणूनच की काय स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी असल्यामुळे ईश्वराने मानवरूप धारण करून आईच्या पोटी जन्म घेतला, असे आपली भारतीय संस्कृती मातृ देवो भवः मानते; परंतु आईच्या मायेचा स्पर्श हा काळानुसार बदलत चालला आहे की काय? या पार्श्वभूमीवर कवी रमेश उंबरगे यांची मातृभक्तीची आस आजही आदर्शस्वरूप कायम असून, ही समाजाला दिलासा देणारी बाब आहे!' रमेश उंबरगे यांनी सुमारे पस्तीस वर्षे पोलीस खात्यातील सीआयडी विभागात अतिशय प्रामाणिकपणे सेवा केली. त्यांच्या कविता संवेदनशील मनाचे दर्शन घडवणाऱ्या आहेत. जगात आईची माया हीच पूर्णपणे खरी असते; त्यामुळे व्हॉट्सॲप आणि फेसबुकपेक्षा आपल्या आईचे नित्य दर्शन घ्या!' असे आवाहन केले.

### वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**पुणे :** जान्हवी फाऊंडेशनतर्फे वारकऱ्यांसाठी दरवर्षी प्रमाणे यावर्षी शनिवार दि.२१/०६/२०२५ रोजी पुण्यातील नाना पेठ येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आदुपारी १२ वा आयोजित करण्यात येणार. डॉ विक्रम गायकवाड यांनी वारीतील वारकऱ्यांच्या आरोग्याच्या बाबीकडे लक्ष देता त्यांची मोफत आरोग्य तपासणी केले जाणार असल्याचे म्हटले आहे.

या शिबिरात वारकऱ्यांना किमान पंधरा दिवस पुरतील एवढी औषधे, गोळ्या देण्यात येणार आहेत. तसेच सदर शिबीरामध्ये वारकऱ्यांचे प्राथमिक उपचार केले जाणार असून त्यांना योग व्यायामाचे मार्गदर्शनही करण्यात येईल. हे शिबीर जान्हवी फाऊंडेशनच्या वतीने घेण्यात येणार आहे, असे डॉ विक्रम गायकवाड यांनी सांगितले. तेव्हा वारकऱ्यांनी या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# नादब्रह्म ढोल-ताशा ध्वज पथकाचे १५ व्या वर्षांत पदार्पण

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

ताशाची तर्री आणि ढोलांचा निनाद हे पुण्याच्या गणेशोत्सवाचे वैभव आहे. त्यामुळे गणेशोत्सवापूर्वी तरुणाई एकत्र येत वाद्यवादनाचा सराव सुरू होतो. पुण्यातील नादब्रह्म ढोल ताशा ध्वज पथक (ट्रस्ट) पुणेचा वाद्यपूजन व सराव शुभारंभ सोहळा उत्साहात पार पडला. मात्र, केवळ वाद्यपूजन व सरावाचा श्रीगणेशा न करता यावेळी सामाजिक उपक्रमांचा देखील श्रीगणेशा 'नादब्रह्म' च्या वादकांनी केला आहे. नादब्रह्म ढोल ताशा ध्वज पथक (ट्रस्ट) पुणेच्या वतीने सिंहगड रस्त्यावरील माणिकबाग परिसरात इंडियन ह्यूम पाईप कंपनीच्या मागे वाद्यपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



आमदार हेमंत रासने म्हणाले, तब्बल ३० ते ४० वर्षांपूर्वी वर्गणीकरिता कार्यकर्ता जायचा तेव्हा गणेशोत्सवाची चाहूल लागायची. आता, आपल्या पारंपरिक वाद्यांचे महत्त्व आपण ओळखले असून ते वाढविण्याकरिता अनेक पथके निर्माण झाली आहेत. या वाद्यांचा नाद ऐकू आला की गणेशोत्सवाची चाहूल लागते. देशाची सांस्कृतिक राजधानी म्हणून पुण्याची ओळख आहे. ती ओळख ढोल-ताशाच्या माध्यमातून देखील होऊ लागली असल्याची बाब आनंददायी आहे. तर कमलेश कामठे यांनी सन २०११ साली पथकाची स्थापना झाली असून यावर्षी आपण १५ व्या वर्षांत पदार्पण करीत आहोत आणि यंदा चार नवीन ताल ऐकायला मिळणार आहेत, अशी माहिती दिली.

### विश्वस्त मंडळाच्या कार्यकर्त्यांतर्फे अश्वांचे पूजन

# श्रीमंत 'दगडूशेठ' गणपतीला माऊलींच्या अश्वराजांची अनोखी मानवंदना

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यातील मानाच्या अश्वराजांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला अनोखी मानवंदना दिली. अश्वांनी मंदिराच्या थेट सभामंडपात प्रवेश करुन गणरायाला वंदन केले. यावेळी ज्ञानोबा माऊली तुकाराम... आणि गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष झाला. मंदिरात भाविकांनी अश्वांचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली होती.



कर्नाटक बेळगावमधील अंकली येथून शितोळे सरकार यांच्या मालकीच्या या दोन अश्वांचे आगमन पुण्यामध्ये झाले. यावेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे मंदिरात या अश्वांचे पूजन करण्यात आले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, ज्ञानेश्वर रासने, मंगेश सूर्यवंशी, राजाभाऊ पायमोडे, प्रतीक घोडके, राजू वायकर, रोहित लोंढे यांसह श्रीमंत उर्जितसिंह शितोळे, श्रीमंत महादजी राजे शितोळे, युवराज विहानराजे शितोळे, श्रीमंत मोहिनीराजे शितोळे यांसह पुणेकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शितोळे सरकार म्हणाले, दरवर्षी सुमारे ३०० किलोमीटरचा पायी प्रवास करून हे अश्व वारीला जातात. काही वर्षांपूर्वी या प्रवासात मंदिराबाहेरुन गणरायाचे दर्शन होत असे. आता दरवर्षी अश्व गणरायासमोर सभामंडपात जाऊन मानवंदना देत असून ही शुभ गोष्ट आहे.

माऊलींचे अश्व आणि गणरायाची ही अनोखी भेट आहे. यंदा देखील गणेशाचे दर्शन घेऊन हे अश्व आता आळंदीकडे प्रस्थान करतील. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, गेल्या काही वर्षांपासून हे अश्व मंदिराच्या सभामंडपात येऊन गणरायाला मानवंदना देत आहेत. वारीची शेकडो वर्षांची परंपरा आहे. यंदा देखील या अश्वांनी मंदिरात येत गणरायाचे दर्शन घेतले. आषाढी वारी ही विठ्ठल भक्तांची वारी आहे. त्यामुळे ज्यांना या वारीला येता येत नाही, ते या अश्वांचे दर्शन घेतात.

# बँक ऑफ महाराष्ट्र, एसबीआय कार्ड यांच्यात को-ब्रँडेड क्रेडिट कार्डसाठी सामंजस्य करार

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

भारतातील आघाडीच्या सार्वजनिक क्षेत्रातील बँक-बँक ऑफ महाराष्ट्रने, भारतातील सर्वात अधिक क्रेडिट कार्ड देणारा संस्थापक-एसबीआय कार्डसोबत को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड सुरू करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या भागीदारीतून ग्राहकांच्या आर्थिक आणि आधुनिक जीवनशैलीच्या गरजा लक्षात घेऊन खास सुविधायुक्त क्रेडिट कार्ड्स सादर करण्यात येणार आहेत.

या वेळी बोलताना, निधू सक्सेना, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले; "एसबीआय कार्डसोबतची ही भागीदारी आमच्या किरकोळ (रिटेल) सेवा क्षेत्रात एक मोठे पाऊल आहे. यामुळे आमच्या ग्राहकांना अधिक सोयीस्कर, आधुनिक आणि फायदेशीर सेवा देता येतील. विश्वासार्ह भागीदारांसोबत अशी युती करून आम्ही नेहमीच ग्राहकहिताला प्राधान्य देतो." या भागीदारीचा उद्देश म्हणजे, बँकेचा विश्वासार्ह ग्राहकसंपर्क आणि विस्तृत शाखा जाळ्यांचा फायदा, तसेच एसबीआय कार्डच्या क्रेडिट कार्ड क्षेत्रातील अनुभव आणि डिजिटल सेवा यांचा योग्य संगम घडवून ग्राहकांना अधिक मूल्य प्रदान करणे.

या भागीदारीअंतर्गत, बँकेचे ग्राहक आकर्षक फिचर्स असलेली को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड वापरू शकतील-जसे की रिवॉर्ड पॉइंट्स, कॅशबॅक ऑफर्स, इंधन अधिभार शुल्क माफी, ईएमआय सुविधा आणि डायनिंग, प्रवास, ई-कॉमर्ससारख्या क्षेत्रांमध्ये खास सवलती. को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड बँकेच्या पात्र ग्राहकांसाठी देशभरात ऑनलाइन आणि शाखामार्फत अर्ज करून उपलब्ध करून दिली जाणार आहेत, ज्यामुळे अर्ज प्रक्रिया सोपी व सुलभ होईल.



## काव्यकोडी

**एकनाथ आव्हाड**

### ज्ञान तेथे सन्मान

*विद्याविभूषितांचे*
*गोडवे गातात सारे*
*त्यांच्याकडे ज्ञानाचे*
*असती खळाळते झरे*

*राजा असतो त्याच्या*
*राज्यात पूजनीय*
*विद्वान मात्र साऱ्या*
*विश्वात वंदनीय*

*विद्वानास ठाऊक*
*ज्ञान नाही वाया जात*
*ज्ञानासारखे पवित्र*
*नाही काही जगात*

*जे जे ठाऊक आपणास*
*ते ते वाटून द्यावे*
*ज्ञान दिल्याने वाढते*
*लक्षात पक्के ठेवावे*

*पैसाअडका धनदौलत*
*चोरीस जाऊ शकेल*
*ज्ञानाची चोरी सांगा*
*कशी कोण करेल?*

*ज्ञानाची अक्षरपाटी*
*ज्याची राहील कोरी*
*अज्ञानामुळे आयुष्य*
*दुःखाच्या जाई दारी*

*अज्ञानामुळेच पुढे*
*वाढत जाते अंधश्रद्धा*
*प्रगतीच्या मार्गात मग*
*येती अवघड बाधा*

*म्हणूनच ज्ञानाची गंगोत्री*
*आपण सारे होऊ*
*ज्ञानाचे दीप लावूनी*
*अज्ञानाला पळवून लावू*

### काव्यकोडी

*१) एक बसतो खाली*
*लांब पाय पसरून*
*बाकीचे जातात*
*पाय त्याचा ओलांडून*

*नंतर तो पायावर*
*करंगळीवर करंगळी धरतो*
*कोणता खेळ हा हळूहळू*
*कठीण होऊन जातो?*

*२) एक गट सात दगड*
*एकावर एक रचतो*
*दुसरा गट चेंडू मारून*
*ते पाडून टाकतो*

*चेंडूला चुकवत मग*
*पुन्हा रचायचा थर*
*या पारंपरिक खेळाचे*
*नाव सांगा लवकर?*

*३) विष देऊन थांबवायचं*
*अमृत देऊन पळवायचं*
*राज्य आल्यावर दुसऱ्यांच्या*
*मागे मागे धावायचं*

*अमृत द्यायला खेळाडू*
*शिल्लक राहत नाही*
*तोपर्यंत कोणता बरं*
*खेळ खेळला जाई?*

उत्तर -
१) कांदा फोडी
२) लगोरी
३) विष अमृत

eknathavhad23 @gmail.com

## चित्र रगवा बक्षीस जिंका

चित्र रंगवून ई-मेल करा आणि बक्षिसे जिंका चित्रासोबत नाव व पत्ता लिहून पाठवणे.

kilbil@prahaar.co.in

**चित्र रंगवा आणि बक्षीस मिळवा...**

चित्र रंगवून कात्रण ई-मेल करा अथवा टपालाद्वारे गुरुवारपर्यंत पाठवणे.

स्पर्धकाचे नाव, फोटो शाळेचे नाव व ठिकाण, इयत्ता, घरचा पत्ता आणि संपर्क क्रमांक.

सर्वोकृष्ट चित्र रंगवणाऱ्या विजेत्याला बक्षीस आणि प्रसिद्धी दिली जाईल.

प्रहारचे कर्मचारी आणि त्यांच्या परिवारास स्पर्धेत भाग घेता येणार नाही.





**चित्र रंगवा विजेता :**
**कौस्तुभ निलेश शेळके**
शाळा : से. ६; सारसोले गांव; सद्गुरु निवास चौथा मजला, रुम न ४०७; नेरुळ - नवी मुंबई पिन कोड ४००७०६



परीक्षक : मनिषा दिवाकर जाधव
मुख्याध्यापिका
सुषमा पाटील विद्यालय व ज्यु. कॉलेज, कामोठे. नवी मुंबई.





# दिवसा सूर्याकडे का बघू नये?



**कथा**

**प्रा. देवबा पाटील**

आदित्य व त्याच्या मित्रांजवळ तो सुभाष नावाचा मुलगा आता शाळेच्या मधल्या सुट्टीत रोजच येऊन बसू लागला व जेवता जेवता त्यांच्या सूर्यावर चांगली चर्चा घडू लागली.

"सूर्यात एवढी प्रचंड उष्णता कोठून आली असेल गड्या?" बंटूने शंका काढली.

"सूर्य हा अतिशय उष्ण वायूंचा तप्त असा तारा आहे. त्याच्या बाह्यभागाचे तापमान ६ हजार अंश सेल्सिअस असून अंतर्भागाचे तापमान ५ लक्ष अंश से. पेक्षाही जास्त आहे. सूर्यामध्ये कोणकोणते तप्त वायू आहेत हे तुम्हा सर्वांना माहीतच असेल?" सुभाषने विचारले.

"हो. सूर्यात मुख्यतः ७० टक्के हायड्रोजन व २८ टक्के हेलियम या वायूंचे अतिउष्ण असे मिश्रण आहे. बरोबर आहे मित्रा?" आदित्यने त्याला विचारले.

"हो, दादा." त्या सुभाषने सांगण्यास सुरुवात केली, "सूर्य हा अतिशय उष्ण वायूंचा तप्त असा तारा आहे. सूर्यात मुख्यतः हायड्रोजन व हेलियम वायूंचे अति उष्ण असे मिश्रण आहे. सूर्यावरील प्रचंड तापमानाने हायड्रोजनच्या अणूंमध्ये सतत अणुकेंद्र समन्वयाची म्हणजे अणुसंमिलनाची प्रक्रिया होत असते. त्यामुळे हायड्रोजन वायूचे हेलियम वायूत सतत रूपांतर होत असते. सूर्याच्या अंतरंगात या तप्त वायूंमध्ये सतत रासायनिक प्रक्रिया होत असतात. या प्रक्रिया होत असताना भराभर वेगाने एकत्र येणाऱ्या हायड्रोजनच्या अणूंच्या घर्षणाने व दाबाने त्यांच्या केंद्रभागी प्रचंड प्रमाणात उष्णता निर्माण होत असते. तीच उष्णता सूर्याबाहेर पडते. तीच उष्णता सूर्यमालेतील साऱ्या ग्रहांकडे व आपल्या पृथ्वीकडे येते. पृथ्वीपर्यंत पोहोचेपर्यंत पृथ्वीभोवतीच्या वातावरणाने त्या उष्णतेची तीव्रता कमी कमी होत ऊबदार सूर्यप्रकाशाच्या रूपात ती आपणास मिळते. तरीही ती उष्णता खूप तीव्र असतेच."

"दिवसा सूर्याकडे का बघू नये?" मोन्टूने प्रश्न केला.

"सूर्यापासून मिळणारी उष्णता खूपच तीव्र असते. या तीव्र उष्णतेमुळे दिवसा सूर्याचा प्रकाश हा अतिशय प्रखर म्हणजे तेजस्वी असतो. त्यामुळे दिवसा सूर्याकडे बघितल्यास आपल्या डोळ्यांना अंधत्व येण्याचा धोका असतो म्हणून दिवसा सूर्याकडे मुळीच बघू नये." सुभाषने उत्तर दिले.

"सूर्यप्रकाश आपल्यापर्यंत पोहोचायला किती वेळ लागतो?" बंटूने प्रश्न केला.

सुभाष म्हणाला, "सूर्याचा प्रकाश पृथ्वीपर्यंत केवळ सव्वाआठ मिनिटांतच पोहोचतो."

"त्यावर सौर ज्वाळा कशा असतात गड्या?" मोंटूने प्रश्न केला.

"सूर्यामध्ये फक्त प्रचंड उष्णतेने उसळणारे वायूच आहेत. ते वायू लाटांप्रमाणे किंवा अग्नीच्या ज्वालांप्रमाणे सतत उसळत असतात. या उसळणाऱ्या वायूंच्या लाटांनाच सौर ज्वाळा असे म्हणतात. सूर्यावर त्या सतत निर्माण होतच असतात." सुभाषने उत्तर दिले.

"सौर उत्सर्जन म्हणजे काय असते मग?" चिंटूने प्रश्न केला.

तो म्हणाला, "सूर्यापासून निघालेली प्रारणे ही सौर ऊर्जेच्या रूपाने अवकाश पोकळीत कित्येक किलोमीटर अंतर कापून पृथ्वीवर येऊन पोहोचतात. त्यांच्या या वहनाला कोणत्याही माध्यमाची गरज नसते. अशा वहनाला सौर उत्सर्जन असे म्हणतात."

"हे प्रारणे म्हणजे काय असते?" पिंटूने विचारले. "प्रारणे म्हणजे उष्णता किरण, प्रकाश किरण, क्ष-किरण, अतिनील किरण, गॅमा किरण, रेडिओ तरंग अशा सर्व प्रकारच्या किरणांचा तरंग रूपात वहन करणारा शक्तिशाली समुच्चय." तो सुभाष उत्तरला.

"सूर्य आपल्या पृथ्वीपासून किती दूर आहे? त्याचे आकारमान, वस्तुमान किती आहे?" अंतूने प्रश्न केला.

"आपल्या पृथ्वीपासून हा आपला सूर्य ९ कोटी ३० लक्ष मैल म्हणजे १४ कोटी ९६ लाख किमी दूर आहे." सुभाषने उत्तर दिले.

एवढ्यात नेहमीसारखी मधली सुट्टी संपल्याची शाळेची घंटी झाल्यामुळे पुन्हा सारे आपापल्या वर्गात निघून गेले.

# आनंदाने जगावे!





**कथा**

**रमेश तांबे**

एक होती बाग. बागेत खूप फुले फुलली होती. गुलाब, झेंडू, अस्टर, चाफा, सूर्यफूल, मोगरा, जाई-जुई आणि पारिजात! पाण्यातले कमळ आणि झाडावरचे लालभडक गुलमोहर! असंख्य फुले पण वेगवेगळी! त्यांचा रंग वेगळा, आकार वेगळा. कुणाला सुगंध तर कुणाला रंग. कोणीच एक दुसऱ्या सारखा नाही. तरी आनंदी तरी समाधानी. बागेत फुलपाखरे, भुंगे, चतूर होते. ते फुलातील मकरंद खात होते. त्यांच्यात मध खाण्यावरून भांडणं नव्हती की रुसवे फुगवे नव्हते.

या बागेतल्या एका बाकड्यावर नेहा कधीपासून बसली होती. आजूबाजूला अनेक लहान मुलं-मुली खेळत होती. आजी-आजोबा बसले होते. कोणी बागेला फेऱ्या मारत होते. पण या कुणाकडेही नेहाचे लक्ष नव्हते. ती एकटीच शून्यात बघितल्यासारखी निर्विकार होती.

तेवढ्यात एक फुलपाखरू पिवळ्या जांभळ्या रंग छटांचं नेहाच्या हातावर येऊन बसलं. तेव्हा नेहा थोडी दचकलीच. ती फुलपाखराला झटकणार तोच फुलपाखरू चक्क तिच्याशी बोलू लागलं. "काय नेहा ताई, अशा शांत का बसल्या तुम्ही? तिकडे बघा किती मुलं खेळत आहेत. किती रंगीबेरंगी फुलं फुलली आहेत. किती भुंगे, चतूर, फुलपाखरे मजा घेत आहेत. छान थंडगार वारा सुटलाय. त्या सर्वांचा आनंद घेण्याऐवजी तू तर अगदी गप्प बसली आहे. कसले दुःख आहे, कसला राग आहे तुझ्या मनात सांग मला सांग ना!

तशी नेहा बोलू लागली, "माझ्या मैत्रिणी छान छान कपडे घालतात. नवनवीन पदार्थ रोज डब्यात आणतात. स्वतःच्या गाडीने शाळेत येतात. त्यांच्यासोबत रोज त्यांची आई येते. पण माझ्याकडे मात्र काहीच नाही" असं म्हणून ती रडू लागली. फुलपाखरू म्हणाले, "नेहाताई अगं अशी रडू नकोस. मी काय सांगतो ते ऐक. नेहाने डोळे पुसले आणि फुलपाखरू काय सांगते ते ऐकू लागली. अगं नेहा तो गुलाब बघ. त्याचा लाल गुलाबी रंग किती छान आहे ना. हो पण त्याच्या अंगावर टोकदार काटे आहेत बरं का! ते सूर्यफूल बघ, केवढे मोठे पिवळेधमक अगदी सूर्यासारखे दिसते ना! पण सूर्य मावळले की बिचारे मान खाली घालून बसते. ते गुलमोहराचे झाड बघ, केवढे मोठे आणि त्याची ती लाल भडक फुले, त्याच्याच शेजारी ते जास्वंदाचे फुलझाड, तेही लालसर रंगाचे. पण जास्वंदाची जागा गणपती बाप्पाच्या जवळ आणि बिचारा गुलमोहर गळून पडतो मातीत! तुझ्या लक्षात येते का मी काय म्हणतो ते? अगं नेहा इथे कोणीच परिपूर्ण नाही. कुणाला रंग आहे, तर कुणाला गंध नाही. कुणाला रंग गंधांसोबत काटेदेखील आहेत. कुणाला कायमच पाण्यात राहावे लागते, तर कुणाला अगदी कमी पाण्यावर आयुष्य काढावं लागतं. प्रत्येकाचं आयुष्य किती वेगळं आहे बघ! तरी कोणी दुःखी नाही. निराश नाही की कसली तक्रार नाही. प्रत्येक जण आनंदात!

आपल्याकडे जे आहे त्यात आनंद मानावा. उगाच इतर कोणाशी तुलना करू नये हे लक्षात ठेव. स्वतःकडे बघ. तुझ्याकडे खूप छान छान गोष्टी आहेत त्या इतरांकडे नाही. म्हणून सांगतो, चल उठ, आनंदाने राहा, मजा कर असं म्हणून फुलपाखरू उडून गेलं. मग नेहादेखील निराशा झटकून बागेतल्या मुलांबरोबर आनंदाने खेळू, नाचू, बागडू लागली.

# नागरी भावना

**प्रतिभारंग**

**प्रा. प्रतिभा सराफ**





जपानला उतरल्यावर एअरपोर्टवरच आमच्या टूर मॅनेजरने आम्हाला काही माहिती दिली. (माहिती म्हणायचे की सूचना?) तर त्यानुसार आपण आपल्या हॉटेलमधल्या रूममध्ये गेल्यावर डोक्याला जर विशिष्ट तेल लावत असू तर एखादा नॅपकिन उशीवर ठेवून त्यावर झोपावे. आपल्याला काही तंबाखू खाण्याची किंवा मशेरी लावायची सवय असेल, तर शक्यतो बिछान्यावर बसून ते करू नये. याशिवाय दुखऱ्या अंगाला जर बाम व तत्सम औषधे लावत असाल, तर ती व्यवस्थित पुसून मग झोपा. कोणतीही अशी गोष्ट करू नका की जेणेकरून तिकडच्या चादरींवर कुठचे डाग पडतील!

ही माहिती मी शांतपणे ऐकत होते, हो आणि माझ्यासोबत इतर चाळीसजणसुद्धा! मनात विचार आला अशा सूचना देण्याची गरज का बरे पडत असेल? त्यांना निश्चितपणे याविषयी काही पूर्वानुभाव आलेले असतील आणि म्हणून त्यांना अशा सूचना आधी द्याव्याशा वाटतात, हे त्यांच्याकडून मी समजू शकते; परंतु माणसे अशी का वागतात? इतक्या सुंदर, स्वच्छ पांढऱ्याशुभ्र चादरीवर चढताना ती आपल्याच्याने ती कशी खराब होणार नाही याची स्वतःहून का काळजी घेत नाही?

आता हे फक्त आपण उशी, चादर आणि बेडबद्दल नाही. आपण जेव्हा मित्र-मैत्रिणी मिळून एखाद्या हॉटेलमध्ये जातो आणि शेजाऱ्याच्या रूममध्ये सहज फेरी मारतो तेव्हा त्या रूममध्ये खुर्ची किंवा टेबलावर त्यांनी ओले कपडे वाळत घातलेले दिसतात. लाकडी उंची फर्निचर आणि त्यावरचे पॉलिश यामुळे निश्चितपणे खराब होते. असे ओले कपडे आपण आपल्या घरच्या फर्निचरवर टाकतो का? कधीच नाही. याचे कारण आपल्याला निश्चितपणे माहीत असते की लाकडी फर्निचर ओलाव्याने खराब होते. याचा अर्थ दुसऱ्यांच्या वस्तूंची आपल्याला काळजी नसते, असा होतो का? की आम्ही मोठी रक्कम देऊन या हॉटेलमधीलही रूम घेतली आहे तर ती आम्ही कशीही वापरू शकतो? की याशिवाय त्यांना असे वाटते की आम्ही असे ओले कपडे लाकडी फर्निचरवर टाकले, तर हॉटेलच्या स्टाफ किंवा मालकाला थोडीच कळणार आहे? अशी काहीशी त्यांची भावना असते.

एकदा दोन-तीन दिवसांच्या सहलीसाठी गेल्यावर, एका छोट्या ग्रुपबरोबर मी एका हॉटेलमध्ये उतरले होते. माझी मैत्रीण म्हणाली की, तू माझ्याच रूममध्ये चहासाठी ये! मी तिच्या रूममध्ये चहासाठी गेले तेव्हा तिने चहाचा कप हातात दिला आणि मी आश्चर्याने तिला विचारले की या चहात, चहा पावडर भरलेली कागदी पिशवी बुडवलेली दिसत नाही, तू काढून टाकलीस का? तर ती शांतपणे म्हणाली, "नाही चहाच्या किटलीमध्ये त्या कागदी पिशव्या कापून मी आपण घरी करतो तसा उकळून चहा केलेला आहे." मी तिला म्हटले, "अगं त्या किटलीवर व्यवस्थित इंग्रजीमध्ये आणि हिंदीमध्ये लिहिलेले आहे की, ही किटली फक्त पाणी उकळण्यासाठी आहे."

ती म्हणाली, "चहा कसा फक्कड झालाय घरच्यासारखा... त्याची मजा घे ना, त्यांना थोडीच कळणार आहे की या किटलीमध्ये मी चहा पावडर आणि दुधाची पावडर टाकून, उकळून चहा बनवला आहे?"

समोर ठेवलेले वेफर्स तोंडात टाकत ती तिचा चहा आनंदाने पीत होती ते पाहून माझे आणखी डोके फिरले. मनात आले हिच्या घरातील इलेक्ट्रिक किटलीमध्ये ही अशा स्वरूपात चहा बनवेल का? तर निश्चितच नाही. पण मी काहीच बोलले नाही.

या निमित्ताने या लेखातून मला मांडायचे आहे की सार्वजनिक ठिकाणी वापरण्याच्या वस्तूंची आपण कितपत काळजी घेतो? आम्ही शाळेतल्या मैत्रिणी कर्जतच्या एका फॉर्मवर एका दिवसाच्या पिकनिकसाठी गेलो होतो. आम्ही तिथे कोणतेही रूम बुक केलेली नव्हती. आम्ही स्विमिंग पूल व काही वॉटर गेम्स खेळून पाण्याबाहेर निघालो तेव्हा चेंजिंग रूम म्हणजे जिथे कपडे बदलून आपण कोरडे कपडे घालतो त्या ठिकाणी प्रचंड गर्दी होती. मी सहज रिसेप्शनमध्ये जाऊन सांगितले, "आम्ही सहा मैत्रिणी आहोत, आमचा चेंजिंग रूममध्ये नंबर यायला अजून तास जाईल. आम्ही परत जाण्यासाठी गाडी बोलवली आहे तर आम्हाला घाई आहे. आम्हाला आणखी कुठेतरी रूम देऊ शकाल का जिथे आम्ही पटकन कपडे बदलून इथून निघून शकू?" आमची समस्या त्यांच्या लक्षात आली आणि त्यांनी ताबडतोब आम्हाला एक रूम उघडून दिली आणि सांगितले की इथे कपडे बदला. त्या रूममध्ये गेल्यावर आमची एक मैत्रीण त्या बेडवर बसली. तिचे कपडे ओले होते ते पाहून माझी दुसरी मैत्रीण तिला म्हणाली, "तुझ्या घरी अशा ओल्या कपड्याने तू बेडवर बसली असतीस का? त्याबरोबर ती तिथून पटकन उठली आणि 'सॉरी' म्हणाली. हे जे माझ्या मैत्रिणीला जमले ते मला जमलेले नाही. मला हेही माहीत आहे की आपल्यापैकी अनेकांना ते जमत नाही. चार लोकांसमोर आपण अशा तऱ्हेने कोणाला बोलू शकणे फार महत्त्वाचे आहे. मला वाटते त्याचा परिणाम असा झाला असेल की त्यानंतर आमची कोणतीही मैत्रीण कधी ओल्या कपड्याने दुसऱ्यांच्या बेडवर बसली नसेल!

चारचौघांसमोर एखाद्याला त्याच्या चुकीची जाणीव करून देणे, फार महत्त्वाचे आहे. मला कधी-कधी समोरचा व्यक्ती चुकीचा वागतो हे कळते पण अशी जाणीव करून देणे जमत नाही. पण मला असे वाटते की प्रत्येकाला हे जमलेच पाहिजे! त्या दृष्टीने मी आता प्रयत्नही करणार आहे कदाचित त्यामुळे माझ्या शत्रूपक्षात वाढ होईल! परंतु आपण काही चांगली नागरी भावना (सिविक्स सेन्स) समाजात रुजवू शकलो याचे समाधानही निश्चितपणे मिळेल! या लेखाच्या निमित्ताने मी वाचकांनाही विनंती करते की, त्यांनी सार्वजनिक मालमत्ता चुकीच्या पद्धतीने हाताळताना माणसांना पाहिले आहे. का? आणि त्यांना कधी दुसऱ्या माणसांना 'अशा तऱ्हेने हाताळू नका', याची जाणीव करून देता आली आहे का?

pratibha.saraph@ gmail.com

# निर्धार





**लहानशा गोष्टी, मोठा अर्थ**

**शिल्पा अष्टमकर**

निर्धार करणं म्हणजे निश्चय करणं, मनाशी पक्क ठरवणं, दृढ निश्चय केला की " सुंभ जळो की पारंबी तुटो" निर्धारापासून आपलं मन मग ढळत नाही, विचलित होत नाही. कविवर्य मोरोपंतांनी देवाची आळवणी करताना म्हटलं आहे, 'हे देवा, न निश्चय कधी ढळो".

जीवनात यशस्वी व्हायचा कानमंत्र म्हणजे निर्धार पक्का हवा. कुठल्याही प्रसंगी मग आपण खंबीरपणे उभे राहू शकतो, संकटाशी टक्कर देऊ शकतो, शर्थीचे प्रयत्न करून यश खेचून आणू शकतो. निर्धाराचे सामर्थ्य आपल्या पाठीशी असले म्हणजे मग आपल्याला कसलेच भय नसते. मन कमकुवत असेल तर मध्येच हात-पाय गाळले जातात, मध्येच प्रयत्न सोडून दिले जातात. या उलट मनानं निर्धार केला की, आपण संकटाची तमा बाळगत नाही, संकटांनी खचून जात नाही, माघार घेत नाही, हताश होत नाही. खंबीर मनाने ताठ मानेने उभे राहून प्रयत्नांची शिकस्त करून अंती यशापर्यंत पोहोचतो.

मात्र निर्धार दुसऱ्यांनं नाही, आपला आपण निर्णय घ्यायचा, मार्ग आपण शोधायला हवा, ध्येय आपण ठरवायला हवं आणि ध्येयसिद्धीपर्यंत न कंटाळता, न खचता, प्रयत्न करत पुढची वाटचाल करीन असा निर्धार आपण करायला हवा.

छोट्या ध्रुवाने मनाशी निर्धार करून त्याच्या पूर्तीसाठी घरदार सोडलं, त्याच्या त्याच निर्धाराने कुणीही हिरावून घेऊ शकणार नाही असं अढळ स्थान ध्रुव बाळाला मिळालं. वीर बाजीप्रभूंने शर्थीने खिंड लढवली कारण त्याचा निर्धार ठाम होता. इंग्रजांना "चले जाव'' म्हणून ठणकावून सांगण्यामागचा देशभक्तांचा, क्रांतिकारकांचा निर्धार ठाम होता. ''स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवीनच, मिळवीन" असं जुलमी इंग्रजी सत्तेला सांगणाऱ्या लोकमान्य टिळकांचा निर्धार असामान्य होता. ''मेरी झांसी नही दूंगी" हा झाशीच्या राणीचा निर्धार म्हणजे जणू काळ्या दगडावरची रेघ.

निर्धार म्हणजे मनात एखाद्या गोष्टीबद्दल घेतलेला ठाम निर्णय - तोही कोणत्याही अडचणींवर मात करत यशस्वी होण्यासाठी. निर्धार हा यशाचा पहिला आणि महत्त्वाचा टप्पा असतो. मनात एकदा ठरवलं की "हे मला करून दाखवायचंच!", तर अर्ध यश तिथेच मिळालं असं समजावं.

**निर्धाराचे महत्त्व :**

**१. ध्येय निश्चित करतो :** ज्याचं जीवन ध्येयविना असतं, त्याचं जीवन दिशा हरवलेल्या जहाजासारखं असतं. निर्धार आपल्याला योग्य दिशेने वाटचाल करायला शिकवतो.

**२. अडचणींवर मात करतो:** निर्धार असल्यास संकटं छोटी वाटतात. उदाहरणार्थ, अपंग असूनही खेळात सुवर्णपदक जिंकणारे खेळाडू हे निर्धाराचं उत्तम उदाहरण आहेत.

**३. स्वतःवर विश्वास निर्माण होतो :** एकदा निर्धार केला की, आपोआप आत्मविश्वास निर्माण होतो. स्वतःवर विश्वास ठेवणारा व्यक्ती जग जिंकू शकतो.

**४. सतत प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळते :** अपयश आलं तरी निर्धार टिकून राहिला की, यश नक्की मिळतं.

**उदाहरण :**

स्वामी विवेकानंद : "उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका!" हे त्यांचं वाक्य निर्धाराचं उत्तम उदाहरण आहे.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम : गरिबीतून शिक्षण घेऊन भारताचे राष्ट्रपती होणे हे त्यांच्या निर्धाराचं फळ आहे.

**विद्यार्थ्यांनी कसा निर्धार करावा?**

१) दररोज एक छोटं ध्येय ठरवावं. मोबाईल, टीव्ही यासारखे व्यत्यय टाळावेत.

२) आत्मचिंतन करावं - " मी काय करू शकतो?" याचा विचार करावा.

३) यशस्वी लोकांच्या गोष्टी वाचाव्यात आणि शिकावं.

निर्धार हा आयुष्य बदलणारा मंत्र आहे. तो जसा विद्यार्थ्यांच्या यशात मदत करतो, तसाच मोठ्या माणसांनाही यशाकडे घेऊन जातो. त्यामुळे "मी हे करू शकतो" हा निर्धार मनात ठेवून सतत प्रयत्न करावे. यश नक्की मिळेल!

निर्धाराची तार जर आत्मविश्वासाने छेडलीत, तर यशाचे सुमधुर संगीत ऐकू शकाल.

अडू नका, खचू नका, निर्धार करा पक्का जीवनात यशस्वी होण्याचा निर्धार हाच हुकमी एक्का.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# आ.संदीप भैय्या शहरात ऑनफील्ड

## वेलडन: शहरातील विविध कामांची पाहणी



पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:शहरातील नागरी प्रश्न आणि कामे मार्गी लागावेत यासाठी आ.संदीप क्षीरसागर, शहरातील विविध भागांमध्ये दररोज जाऊन नागरिकांशी संवाद साधत आहेत. यासोबतच सुरू असलेल्या कामांकडे लक्ष ठेवून आहेत. गुरूवारी (दि.१९) रोजी आ.क्षीरसागर यांनी शहरात सुरू असलेल्या विविध कामांच्या ठिकाणी भेटी देऊन संबंधितांना सुचना दिल्या. बीड शहरात खासबाग ते मोमीनपुरा भागाला जोडणार्या पूल बांधणीचे सर्वेक्षण करण्यासाठी अभियंत्यांचे पथक आले होते. यावेळी आ. क्षीरसागर यांनी अभियंत्यांसोबत जाऊन या ठिकाणी पाहणी केली. याठिकाणी मजबूत आणि भविष्यात दिर्घकाळ टिकणार्या पुलाचे बांधकाम होणार असल्याचे आ.क्षीरसागर यांनी सांगितले. तसेच शहरातील बार्शी नाका ते विधी महाविद्यालयापर्यंत ३३ के.व्ही. विद्युत मार्गिकेचे काम सुरु होत आहे. याठिकाणचीही आ.क्षीरसागर यांनी पाहणी करून संबंधित यंत्रणेला आवश्यक त्या सूचना केल्या. यासोबतच कारंजा ते जुनाबाजार परिसरात नगरपालिकेकडून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. याठिकाणी आ.संदीप क्षीरसागर यांनी पाहणी केली. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, संबंधित यंत्रणेचे अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# आनंदराज आंबेडकर नगर दौऱ्यावर

## माहिती : पक्ष संघटनेचा घेणार आढावा



पुण्यभूमी प्रतिनिधी
नगर:रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर शनिवार २१जुन रोजी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असल्याची माहिती अहिल्यानगर रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांनी दिली असुन आजी माजी पदाधिकारी यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. आगामी नगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटनेचा आढावा घेऊन पदाधिकारी यांना सरसेनानी आनंदराज आंबेडकर काय आदेश देतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे त्यांचा उपस्थितीत अनेक मान्यवर पक्ष प्रवेश करणार आहेत. नगर जिल्हात रिपब्लिकन सेनेचे संघटनात्मक बांधणी करण्यात आली असून नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील इतर पक्षांतील अनेक पदाधिकारी व युवा कार्यकर्ते रिपब्लिकन सेनेत जाहीर पक्ष प्रवेश करणार आहेत त्या पार्श्वभूमीवर आंबेडकर यांच्या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे हॉटेल श्रीराज कल्याण रोड येथे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा कार्यकारिणीने केले आहे

# प्रियदर्शनीसह कन्या प्रशालेत मेळावा

## डॉ.सारिकाताई क्षीरसागर: पालकांसोबत साधला संवाद



पुण्यभूमी प्रतिनिधी
पाटोदा: येथील विनायक युवक कल्याण संस्था संचलित पाटोदा येथील प्रियदर्शनी प्राथमिक शाळा आणि प्रियदर्शनी कन्या प्रशालेत गुरुवारी (दि.१९) पालक मेळावा उत्साहात पार पडला. या दोन्ही कार्यक्रमात कल्पतरूच्या सचिव डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच, पालकांसोबत संवाद साधला.पाटोदा येथील प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत डॉ.क्षीरसागर यांच्यासह संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधीक्षक डॉ.विश्वंभर देशमाने, माजी मुख्याध्यापक एस.आर. जाधव, पान दोन...

# योग दिनानिमित्त वृक्षारोपण

पुण्यभूमी प्रतिनिधी
नगर:जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण ) -२ अंतर्गत शनिवार २१ जुन २०२५ रोजीच्या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या यांच्या सहकार्याने योग सत्रांबरोबरच वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम व समुदायाच्या पुढाकारातून पर्यावरणीय उपक्रम राबविण्यात येणार असल्याची पान दोन...

# स्टेट बँकेकडून रक्तदान शिबिर

## वर्धापन:शिबिरात ५० दात्यांनी केले रक्तदान



पुण्यभूमी प्रतिनिधी
कडा:येथील भारतीय स्टेट बँकेच्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर कडा शाखेत घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ५० जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली. एक जुलै रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाचा ७० वा वर्धापन पान दोन...

# योजनेसाठी बेमुदत धरणे आंदोलन

## आक्रमक : माजी नगरसेवक आंदोलनाच्या पावित्र्यात

पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा निधी तसेच संबंधित योजनेचे तरतुदी, प्रस्ताव सादर करणे बाबत चे सर्व अधिकार पालकमंत्री व जिल्हा प्रशासनाला असल्याने हम करे सो कायदा या म्हणी प्रमाणे प्रशासन वेळकाडू पणा करत आहे. जून महिना लोटत आला तरी देखील बीड नगर परिषदेला निधी देण्यात आलेला नाही हीच परिस्थिती संपूर्ण बीड जिल्ह्याची असून बीड शहरातील वा जिल्ह्यातील अनुसूचित जाती राखीव प्रभागातील विकासात्मक कामे खोळंबले आहेतअनुसूचित जातीच्या समाज बांधवांवर तसेच राखीव प्रभागावर हा एकप्रकारे पान दोन...

# झेडपी केंद्रीय शाळेत साहित्यांचे वाटप

## शैक्षणिक:एसडीएम वसिमा शेख यांची उपस्थिती



पुण्यभूमी प्रतिनिधी
पाटोदा:तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास विशेष उपस्थिती लाभली ती उपविभागीय अधिकारी वसिमा शेख मॅडम यांची. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेंसिली, रंगवही, कंपास इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सय्यद होते. प्रमुख पाहुणे म्हणून जितेंद्र जाधव, तसेच शाळेचे मुख्याध्यापक बांगर सर यांची उपस्थिती होती. यावेळी खेडकर मॅडम, शिंदे मॅडम, काकडे मॅडम, राऊत मॅडम, घोलप मॅडम, ज्योती मॅडम, माया आदी पान दोन...

# मदन महाराज संस्थानची दिंडी

## आध्यत्मिक:बबन महाराज बहिरवालांची माहिती



पुण्यभूमी प्रतिनिधी
कडा:येथील संत मदन महाराज संस्थानची पायी दिंडी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरसाठी २६ जून रोजी कडा येथून प्रस्थान करणार असल्याची माहिती संस्थानचे मठाधिपती हभप बबन महाराज बहिरवाल यांनी दिली. आष्टी तालुक्यातील कडा येथील गुरुवर्य संत मदन महाराज संस्थानची दिंडी दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे जात असते. यावर्षी २६ जून रोजी दिंडी सोहळा कड्यातून प्रस्थान करणार असल्याची माहिती हभप बबन महाराज बहिरवाल यांनी दिली.दिंडीचे हे २१ वे वर्ष आहे. शेरी, धिर्डी, शिराळ, मिरजगाव, पान दोन...

# दुचाकीला कारची धडक;दुचाकीस्वार जखमी

पुण्यभूमी प्रतिनिधी
कडा:तालुक्यातील नगर -बीड रोडवरील वटणवाडीजवळ कार व दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार भरत पंढरीनाथ देवकर रा. शिरापूर (ता. आष्टी) हा इसम गंभीर जखमी झाला आहे.पोलिस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, बुधवार दि. १८ रोजी सायंकाळी सहा वाजेच्या दरम्यान आष्टी तालुक्यातील नगर -बीड रोडवरील वटणवाडी परिसरात दुचाकीस्वार भरत देवकर हे त्यांच्या हिरो होंडा दुचाकीवरून कड्याकडे येताना (एम एच-१७-सीएक्स ५४ ४४) असा क्रमांक असलेल्या हुंडाई कंपनीच्या कारन पान दोन...

# रिपाइं निराधारांसाठी तहसीलच्या दारात

## दखल: आठ दिवसात थकीत मानधन देण्याची ग्वाही



पुण्यभूमी प्रतिनिधी
कडा:तालुक्यातील संजय गांधी निराधार, श्रावण बाळ, रमाई घरकुल, तसेच पंतप्रधान घरकुल योजनेच्या लाभार्थींचे थकीत मानधन त्वरित देण्यात यावे. या मागणीसाठी रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली लाभार्थींच्या उपस्थितीत तहसील कार्यालयाच्या दारात मंगळवारी उपोषण करण्यात आले.याबाबत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने तहसीलदारांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे. की मागील सहा महिन्यापासून संजय गांधी निराधार, श्रावण बाळ योजना तसेच रमाई घरकुल, पंतप्रधान घरकुल या योजनेच्या अनेक लाभार्थींचे मानधन व घरकुलाचे हप्ते थकीत असल्यामुळे लाभार्थी आर्थिक अडचणीत आले आहेत. त्या थकीत योजनेच्या लाभार्थींच्या मानधनासह घरकुलाचे हप्ते त्वरित देण्यात यावेत. या मागणीसाठी तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयाच्या दारात लाभार्थींसह पान दोन...

ज्येष्ठांना मिळणारे थकीत मानधन पदरात पाडून घेण्यासाठी थरथरत्या हातातील काठी टेकवट-टेकवत गावखेड्यातून वयाची नव्वदी पार केलेल्या आजीबाई उपोषणस्थळी आल्या. साहेब, आमचं तेवढं पैसं द्या की, म्हणून विनवणी करीत होत्या, आश्चर्य म्हणजे या आजीबाईंनी मात्र अनेकांचे लक्ष वेधून घेतलं.

# सशालेय साहित्य वाटप करा

## भागवत दराडे : प्रशासनास दिले निवेदन



**पुण्यभूमी प्रतिनिधी**
दिंद्रुड:नुकतेच शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचा ओढा वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप तात्काळ करण्याची मागणी सरपंच भागवत दराडे यांनी केली आहे.धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळेकडे आकर्षित करण्यासाठी गणवेश व शालेय साहित्याचे वाटप तात्काळ करण्यात यावे, शासनाकडून देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पान दोन...